**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

दैनिक
# जनता आवाज

**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी — ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३९ मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

# शिवरायांच्या गडकिल्ल्यांचा प्रस्ताव मंजूर!

## मुख्यमंत्री फडणवीस यांची सभागृहात माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई : युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत देशभरातील १२ गडकिल्ल्यांचा समावेश झाला आहे. यात महाराष्ट्रातील ११ किल्ले आहेत. महाराष्ट्रासाठी ही अभिमानास्पद बाब आहे. महाराष्ट्रातील ११ आणि तमिळनाडूतील एक जिंजी असे एकूण १२ गडकिल्ले आहेत. काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत या बद्दल निवेदन केलं. युनेस्कोच्या यादीत समाविष्ट होणे ही महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे. पंतप्रधानांचे मी आभार मानतो. पंतप्रधानांकडे सात प्रस्ताव गेले होते. मात्र, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचा प्रस्ताव मंजूर केला, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात म्हणाले.**



इतरांनी किल्ले हे महसुली गोळा करण्यासाठी वापरले. मात्र महाराजांनी हे किल्ले स्वराज्यासाठी वापरले. युनोस्कोचे मुख्यालय पॅरिस येथे सादरीकरण झालं. मी आणि माझे सहकारी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची या संदर्भात भेट घेतली होती. यामध्ये मतदानाचा अधिकार २० देशांना असतो. या प्रस्तावावर सर्व २० देशांनी एकमताने निवड केली, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राजमुद्रा याचा विचार त्यांनी समजून घेतला आणि काळाच्या पुढचा विचार असल्याचं त्यांना दिसलं. या कार्यात मदत केलेले सर्वांचे, पंतप्रधान आणि महाराष्ट्रातील तमाम जनतेचे मी अभिनंदन करतो, असं पान ४

### शिवरायांच्या १२ किल्ले युनेस्कोच्या यादीत

### राज्यातील शिवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण

### कुठल्या १२ किल्ल्यांचा समावेश?

शिवरायांच्या एकूण १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या वारसा यादीत स्थान मिळाल्याने शिवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सिंधुदुर्ग किल्ल्यासह रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी, जिंजी या किल्ल्यांचाही समावेश युनेस्को यादीत करण्यात आला आहे.

### ... त्यात सिंधुदुर्ग किल्ल्याचा समावेश

भारतासाठी, विशेषतः महाराष्ट्रासाठी एक अत्यंत अभिमानाचा क्षण आहे, कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीने बांधलेल्या या किल्ल्यांचे सामरिक, स्थापत्य आणि सांस्कृतिक महत्त्व आता जागतिक स्तरावर अधोरेखित झाले आहे. ११ जुलै २०२५ रोजी पॅरिसमध्ये झालेल्या जागतिक वारसा समितीच्या ४७ व्या सत्रात मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया अंतर्गत सिंधुदुर्ग किल्ल्याचा समावेश करण्यात आला.

# साईचरणी सहा कोटींचे दान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने दि. ९ ते दि. ११ जुलै या कालावधीत आयोजित केलेल्या श्री गुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत दक्षिणापेटी, देणगी काऊंटर, ऑनलाईन, चेक डीडी, मनिऑर्डर, डेबीट-क्रेडीट कार्ड, युपीआय, सोने, चांदी व दर्शन, आरतीपास शुल्क आदी सर्व मार्गांनी मिळून एकूण सहा कोटी एकतीस लाख एकतीस हजार तिनशे बासष्ट इतकी देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.



श्री गुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत साधारणतः ३ लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला. उत्सव कालावधी मध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे १ लाख ८३ हजार ५३२ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला तर दर्शन रांगेत १ लाख ७७ हजार ८०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले.

या कालावधीत सशुल्क प्रसादरुपी लाडू पाकीटांच्या विक्रीतून ६४ लाख ५ हजार ४६० रूपये प्राप्त झाले. उत्सव काळात हजारो साईभक्तांनी संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साईआश्रम निवास व साईधर्मशाळा आदी ठिकाणांबरोबर अतिरिक्त निवास व्यवस्थेकरीता उभारण्यात आलेल्या मंडपात निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. तसेच साईधर्मशाळा येथे विविध भागातून आलेल्या पालख्यांमधील पदयात्री साईभक्तांनी निवास व्यवस्थेचा लाभ घेतला.

देणगीचा वापर श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, रुग्णालये, शैक्षणिक संकुल या सेवा कार्याबरोबरच साईभक्तांच्या विविध सेवा सुविधांसाठी होत आहे.
**– गोरक्ष गाडीलकर, सीईओ**

सदर देणगीमध्ये रोख स्वरुपात रुपये १ कोटी ८८ लाख ८ हजार १९४ दक्षिणा पेटीत प्राप्त झाली असून, देणगी काऊंटर १ कोटी १७ लाख ८४ हजार ५३८ रुपये, पी.आर.ओ. सशुल्क पास ५५ लाख ८८ हजार २००, डेबीट क्रेडीट कार्ड,ऑनलाईन देणगी, चेक डी. डी.देणगी, मनी ऑर्डर असे एकूण ०२ कोटी ५ लाख ७६ हजार ६२६ रुपये, सोने ६६८.४०० ग्रॅम रक्कम रुपये ५७ लाख ८७ हजार ९२५ व चांदी ६,७९८.६८० ग्रॅम रक्कम रुपये ०५ लाख, ८५ हजार ८७९ यांचा समावेश आहे.

## संमिश्र

### पंजाब-हरियाणात ईडीच्या छाप्यात देश-परदेशातील स्टँप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जालंधर** : जालंधर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पंजाब आणि हरियाणामध्ये पसरलेल्या बेकायदेशीर डंकी रूटवर नेटवर्कवर मोठी कारवाई केली आणि ११ जुलै रोजी मानसा (पंजाब), कुरुक्षेत्र आणि कर्नाल (हरियाणा) येथील ७ ठिकाणी छापे टाकले.यात अनेक देशांचे बनावट सील, व्हिसा टेम्पलेट्स आणि आक्षेपार्ह साहित्य जप्त केले आहे.

### बॅडमिंटनपटू सायना नेहवालचा घटस्फोट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हिसार** : हरियाणातील हिसार येथे जन्मलेली बॅडमिंटनपटू सायना नेहवाल पती पारुपल्ली कश्यपपासून वेगळी होणार आहे. सायना नेहवाल म्हणाली की, आम्ही दोघांनीही परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. सायना नेहवालने या निर्णयाबाबत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली आहे. दोघांनी २०१८ मध्ये प्रेमविवाह केला होता.

### सुरत-चेन्नई कॉरिडॉर भूसंपादनाला स्थगिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोलापूर** : सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉर महामार्ग सोलापूर जिल्ह्यातून जात आहे. त्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया गेल्या साडेतीन वर्षांपासून रेंगाळली आहे. ५,५७३ शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत ३५०० शेतकऱ्यांनाच मोबदला मिळाला आहे.

# शिवसेना पक्ष, धनुष्यबाणावर होणार फैसला?

## तीन महिन्यांत निकाल: 'सर्वोच्च'ने सुनावणीत दिले स्पष्ट संकेत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : सर्वोच्च न्यायालयात काल शिवसेनेच्या वादावर सुनावणी झाली. त्यात सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण पुढील ३ महिन्यांत निकाली काढण्याचे स्पष्ट संकेत दिले. त्यामुळे शिवसेना हे नाव व धनुष्यबण हे निवडणूक चिन्ह कुणाचे? यावर ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात फैसला येण्याची दाट



शक्यता आहे. दरम्यान, सुप्रीम कोर्टात जून २०२२ पासून शिवसेनेचा वाद प्रलंबित आहे. यावरील सुनावणी वारंवार पुढे ढकलण्यात येत असल्यामुळे मोठी नाराजी व्यक्त केली जात आहे.

शिवसेनेत २०२२ मध्ये मोठी बंडखोरी झाली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील गटाला शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह दिले होते. निवडणूक आयोगाच्या या आदेशांना उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले होते. त्यांच्या या याचिकेवर काल सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. त्यात खंडपीठाने हे प्रकरण ऑगस्टमध्ये सुनावणीसाठी घेण्याचे संकेत दिले. तत्पूर्वी ठाकरे गटाने स्थानिक पान ४

### ठाकरेंचा नाव, चिन्ह, झेंड्यावर दावा

महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होणार आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी आपल्या याचिकेद्वारे शिवसेना हे नाव, धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह तथा वाघासह भगवा ध्वज पुन्हा वापरण्याची परवानगी देण्याची मागणी केली आहे. कोर्टाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रकरणात अजित पवार गटाला सशर्त चिन्ह वापरण्याची परवानगी दिली होती. तशी परवानगी आम्हाला दिली जावी असा त्यांचा युक्तिवाद आहे. त्यावर कोर्ट काय निर्णय देतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# ... हल्ला करणाऱ्या काटेंकडे बंदूक होती?

## आ. रोहित पवार यांचा खळबळजनक आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे रविवारी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर काळी शाई फेकून धक्कादायक हल्ला करण्यात आला. यावेळी दीपक काटेकडे आधी पिस्तुल सापडले असल्याचा खळबळजनक आरोप आ. रोहित पवार यांचा यांनी केला.

फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाज आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते आले असताना, काही लोकांनी त्यांच्या गाडीसमोर आक्रमकपणे येऊन काळी शाई फेकली आणि त्यांना खाली ओढून मारहाण केली. या हल्ल्यामागे भाजपशी संबंधित शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.



या प्रकरणी दीपक काटे, किरण साळुंखे, भवानेश्वर शिरगिरे यांच्यासह एकूण सात जणांविरोधात अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी यापैकी दोन आरोपींना अटक केली असून पाच आरोपी सध्या फरार आहेत. प्रविण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहित पवार हे काळ्या रंगाचा शर्ट परिधान करत हातामध्ये पोस्टर घेत विधानभवन परिसरात दाखल झाले.

रोहित पवार माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, पुरोगामी विचारासाठी लढणारे प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेकण्यात आली आहे. दिपक काटे नावाच्या भाजप कार्यकर्त्याने जे कृत्य केले त्याचा आम्ही निषेध करतो. दाभोळकर, पानसरे, गौरी लंकेश, कलबुर्गी यांनी जो समाजाला जो विचार दिला तो त्यांना पटला नाही म्हणून त्यांची हत्या करण्यात आली. आता प्रविण गायकवाड जो पुरोगामी विचार घेऊन जात आहेत तो त्यांना पटला नाही म्हणून त्यांच्यावर शाई फेकण्यात आली.

काटेकडे आधी पिस्तुल सापडले. त्याच्याकडे २८ काडतुसे सापडली. प्रवीण गायकवाड लढणारे आहेत, ते घाबरणारे नाहीत. ते बाजूला जाऊन थांबले. परंतु, काटे हा प्रविण गायकवाड यांना पुन्हा घेऊन आला. काटे याच्याकडे बंदूक होती, अशी देखील माहिती मिळाली. कुठेतरी गायकवाड यांना मारण्याचा प्रयत्न होता. त्याने स्वतःच्या भावाला देखील सोडले नाही. त्याला देखील मारलं आहे.
**– रोहित पवार, आमदार**

# निवडणुकीसाठी कामाला लागा

## उपमुख्यमंत्री पवारांचा कार्यकर्त्यांना आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : राज्यात पुढील काही महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका होणार आहेत. यामध्ये मुंबई महापालिकेसह पुणे महापालिकेचा देखील समावेश आहे. पुणे जिल्हा हा राष्ट्रावादीचा बालेकिल्ला मानला जातो. राज्यात सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील महायुतीतच लढवल्या जाणार असल्याचं महायुतीमधील काही नेत्यांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. मात्र दुसरीकडे याबाबत महाविकास आघाडीचं चित्र अजूनही स्पष्ट झालेलं नाहीये, त्यातच आता मुंबईमध्ये पार पडलेल्या विजयी मेळाव्यानंतर मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीबाबत देखील जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पुण्यातून मोठी बातमी समोर येत आहे ती म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. पान ४

# राज ठाकरेंविरोधात डीजीपींकडे तक्रार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : त्रिभाषा धोरणावरून राज्यात बराच गदारोळ झाला होता. पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या निर्णयाला विरोध झाला होता. त्रिभाषा सूत्रीत हिंदी भाषाच्या सक्तीचा निर्णय सरकारने मागे घेतल्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येऊन विजयी मेळावा घेतला. या मेळाव्यात राज ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्यावरुन डीजीपींकेड तक्रार दाखल करण्यात आली आहे.



राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी वरळी डोम येथे आयोजित केलेल्या मेळाव्यात भाषण केले. दरम्यान त्यांनी, मारहाण करतानाचा व्हिडीओ काढू नका असे म्हटले होते. या वक्तव्यावर अक्षेप घेत महाराष्ट्र डीजीपींकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

काल एका व्यापाऱ्याच्या कानफडात मारली. त्याच्या माथ्यावर लिहिलं होतं का गुजराती. इतर हिंदी आणि वेगळ्या चॅनलमध्ये गुजराती माणसाला मारलं. बाचाबाचीत समोरचा गुजराती पान ४

# मोदींचे डीबीटीचे स्वप्न कधी पूर्ण होणार?

## जयंत पाटलांचा विधानसभेत मुख्यमंत्र्यांचा टोला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : विधानसभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी डीबीटीचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून म्हटले की, डीबीटी करण्याचे जे पंतप्रधान मोदींचे स्वप्न आहे, ते साकारण्यासाठी अतिशय चांगली संधी आहे. ही योजना कधी सुरू करण्यात येणार? असा प्रश्न जयंत पाटलांनी उपस्थित केला. यावर मुख्यमंत्री टोला लगावत म्हटले, आजकाल जयंत पाटलांना मोदी साहेबांच्या योजना आवडायला लागल्या आहेत.



जयंत पाटील म्हणाले, प्रत्येकाच्या खात्यावर पैसे देण्याची योजना आता सुरू करावी. आता जर याची बेरीज केली तर आत्ता ६० लाख बेनेफिश्यरी आहेत. ३० लाख जे आहेत त्यांना दोन पेट्या वाटण्यात येतात. ६ हजारची पेटी २ हजारलाही कोणी घेणार नाही, जर आपण बाजारात बघितले तर. त्यामुळे पान ४

माझा प्रश्न असा आहे की, हा गोंधळ महाराष्ट्रात इतका चालू आहे की आता एजंट चालू झाले आहेत. प्रत्येक तालुक्यात एजंट आहे. तुम्हाला आमकं मिळवून देतो, तुम्हाला पेन्शन मिळवून देतो. मुश्रीफ मंत्री असताना हे महामंडळ निर्माण झाले आहे. अध्यक्ष महोदय एवढा मोठा एजंटचा महाराष्ट्रात सुळसुळाट सुरू आहे. म्हणून माझी मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की पंतप्रधानांचे स्वप्न आहे की डीबीटी सुरू व्हावी, तर ही योजना सुरू करणार का? आणि जे एजंट सुरू झाले आहेत, यावर निर्णय घ्यावा.
**– जयंत पाटील, आमदार**




# ... आता प्रश्न सोडविण्यासाठी नवी यंत्रणा कार्यान्वित

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नव्या पॅटर्नची प्रशासनात चर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : नागरिकांच्या समस्यांचा निपटारा तसेच सार्वजनिक प्रश्न सोडविण्यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नव्या पॅटर्नची जोरदार चर्चा सध्या प्रशासनात सुरु आहे. नागरिकांच्या समस्यांबाबत तसेच शासनाच्या विरोधात दिशाभूल करणाऱ्या वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांची गांभीर्याने दखल घेत यावर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने खुलासा करुन प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा करण्याची नवी यंत्रणा त्यांनी कार्यान्वित केली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणत्याही विभागाच्या विरोधात वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या आणि समाज माध्यमांमध्ये दिशाभूल करणाऱ्या, पान ४

### ... आता पत्रांवर पाठपुरावा सुरु?

बातमी समवेत पाठविण्यात आलेल्या पत्राचा पाठपुरावा मंत्री विखे पाटील यांच्या कार्यालयातून करण्यात येतो. ज्या विभागांच्या तालुकास्तरीय कार्यालयांना पाठवण्यात येणाऱ्या पत्राची प्रत त्यांच्या जिल्हास्तरीय, विभागीय कार्यालयांना तसेच जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात येत असल्याने तीन स्तरावरून या पत्रांवर आता पाठपुरावा सुरु झाला आहे.

### नागरिकांचे प्रश्न लागताहेत निकाली

पालकमंत्री कार्यालयातही याबाबतचे खुलासे तसेच नागरीकांचे प्रश्न निकाली लागत असल्याचे अहवाल केलेल्या कार्यवाहीसह प्राप्त होवू लागल्याने, पालकमंत्री विखे पाटील यांच्या नव्या पॅटर्नची चर्चा प्रशासनामध्ये आता सुरु झाली आहे. नागरीकांनाही त्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा झाल्याचे समाधान आणि अनुभव या निमित्ताने येवू लागला आहे.

# धर्मांतरविरोधी कायदा लागू होणार

## राज्यमंत्री पंकज भोयर यांची घोषणा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड** : मुंबई : राज्यात अनेक ठिकाणी धर्मांतर करण्याच्या घटना घडत असल्याचा मुद्दा भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत मांडला. यावर पंकज भोयर यांनी स्पष्टीकरण देत समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे सांगितले.



पंकज भोयर म्हणाले, महाराष्ट्रात कुठेही जबरदस्तीने धर्मांतर करण्याची परवानगी नाही. परंतु, एक समिती स्थापन करून अभ्यास करण्यात आला, तेव्हा जवळजवळ ३५ केसेस घडल्या होत्या. मात्र, त्यांनी स्वतःहून धर्मांतर केल्याचे समोर आले. साधे सरळ जे लोक असतात त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न काही संस्था करत असतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून पुढील महिन्यात याचा पान ४

# पाथर्डीत पुन्हा बनावट नोटांचा सुळसुळाट

## पाचशेच्या बनावट नोटांनी व्यापाऱ्यांमध्ये चिंता!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी शहर आणि तालुक्यात पुन्हा एकदा पाचशेच्या बनावट नोटांचा सुळसुळाट झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. किरकोळ व्यवहार करणारे, हातावर पोट असलेले दुकानदार आणि टपरीधारक यांना याचा मोठा फटका बसत असून बनावट नोटा स्वीकारून त्यांची फसवणूक होत आहे.

तालुक्यात यापूर्वीही बनावट नोटा प्रकरणी काही घटना घडल्या होत्या. तेव्हा, पाथर्डी तालुक्यातील दोन आरोपींना ग्रामिण भागात बनावट नोटा चलनामध्ये वापरत असताना दुकानदारांच्या मदतीने पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते. त्यापैकी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते, तर दुसरा फरार झाला होता. त्यामुळे हे रॅकेट केवळ शहरी भागापुरते मर्यादित न राहता आता ग्रामीण भागातही शिरकाव करत असल्याचे चित्र आहे.



शहरातील एका किराणा दुकानदाराला तीन दिवसांपूर्वी एका ग्राहकाने सामान खरेदी करताना पाचशे रुपयांची बनावट नोट दिली. व्यवहारानंतर दुकानदाराच्या ही बाब दुसऱ्या दिवशी लक्षात आली. प्राथमिक चौकशीत ही नोट बनावट असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे पुन्हा एकदा पाथर्डी शहरात बनावट नोटांचे रॅकेट सक्रिय झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठेसह छोट्या दुकानांत, टपऱ्यांवर, हातगाड्यांवर आणि रस्त्यावर विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी बनावट नोटा स्विकारल्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. अशा व्यावसायिकांमध्ये बहुतेक जण हातावर पोट असलेले आ-हेत, त्यामुळे अशा प्रकारची फसवणूक त्यांच्यासाठी मोठे संकट ठरत आहे. मागील काही काळात अनेक प्रकारचे आर्थिक गुन्हे आणि फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत.

# मद्य विक्रीची दरवाढ रद्द करा

## तालुका परमिटरूम धारकांचा बंद ठेवून निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** राज्य सरकारने मद्यावर लागू केलेली दहा टक्के व अतिरिक्त व्हॅट रद्द करावा, यासाठी जामखेड तालुका परमिटरूम धारकांनी काल बिअरबार बंद ठेवून तहसीलदार गणेश माळी यांना निवेदन दिले व शासनाच्या निर्णयाचा निषेध व्यक्त केला.

महाराष्ट्र सरकारच्या व्हॅट टॅक्स धोरणाचा निषेध करून बियर बार रेस्टॉरंटमधील मद्य विक्रीवर महाराष्ट्र शासनाने व्हॅट टॅक्सच्या नाव-ाखाली लादलेला दहा टक्के टर्म ओव्हर टॅक्स आणि दरवर्षी भरमसाठ होणारी परवाना नूतनीकरणावरची फी रद्द करावी. मद्य विक्रीवर फर्स्ट पॉईंट टॅक्स लागू करण्याच्या आग्रही मागणीसाठी काल जामखेड तालुक्यातील सर्व बियरबार परमिट रूम बंद ठेवण्यात आले होते.

यावेळी जामखेड तालुका बियर बार असोसिएशनचे अध्यक्ष केदार रसाळ, दत्तात्रय भोसले, ऋषिकेश खरात, बबन धनवडे, बाळासाहेब पोटरे, प्रमोद बिराजदार इत्यादी बियरबार परमिटरूमधारक उपस्थित होते.



# सशक्त युवापिढी घडविणे ही सामूहिक जबाबदारी

## आ. काशिनाथ दाते; निघोज येथे व्यायामशाळा साहित्याचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** नवीन पिढी शारीरिकदृष्ट्या सक्षम, सशक्त आणि सुदृढ बनली पाहिजे, त्यासाठी योग्य सुविधा आणि साधनसामग्री उपलब्ध करून देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते यांनी केले.



निघोजच्या लाळगे मळ्यातील गुरुदत्त मंदीर येथे स्थानिक युवकांच्या शारीरिक आरोग्यवृद्धीसाठी व्यायाम साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी आ. दाते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रभाकर कवाद होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, जिल्हा उपाध्यक्ष आर. एस. कापसे, संदीप पाटील जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ, राळेगणचे सरपंच पंकज कारखिले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, कोंडीभाऊ लाळगे, मळगंगा ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, मंगेश लाळगे, प्रविण उचाळे, शिवाजी लाळगे, माजी व्हाईस चेअरमन शांताराम लाळगे, संचालक शांताराम कवाद आदी उपस्थित होते.

आमदार दाते म्हणाले की, आजची युवापिढी ही केवळ शिक्षणातच नव्हे, तर क्रीडा, सेवा आणि नेतृत्व क्षेत्रातही सक्षम झाली पाहिजे. त्यासाठी त्यांना पोषक वातावरण आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी योग्य सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

# डाव्या कालव्याला सोडले ओव्हर फ्लोचे पाणी

## आ. काळेंनी केली होती जलसंपदामंत्री विखेंकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** सुरुवातीला पडलेल्या दमदार पावसामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप पिकांच्या पेरण्या केल्या होत्या. परंतु जवळपास एक महिन्यापासून गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रात पावसाने उघडीप दिल्यामुळे खरीप हंगाम धोक्यात आला होता. त्यामुळे गोदावरी कालव्यांना तातडीने ओव्हर फ्लोचे पाणी सोडावे, अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. त्या मागणीची दखल घेवून काल पासून गोदावरी डाव्या कालव्याला ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्यात आले असून उजव्या कालव्याला देखील लवकरच पाणी सोडणार असल्याची माहिती आ. काळे यांनी दिली आहे.

### आ. काळेंकडून ना. विखेंचे आभार

काल (दि.१४) पासून गोदावरी डाव्या कालव्याला ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्यात आले आहे. त्याबद्दल आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघातील शेतकऱ्यांच्या वतीने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहे.



धरण क्षेत्रात असाच पाऊस सुरु राहिल्यास जुलै महिन्याच्या अखेर पर्यंतच जायकवाडी धरण १०० टक्के भरले जाणार असून अद्यापही ओव्हरफ्लोचे पाणी गोदावरी नदीत सोडले जात आहे. याकडे आ. काळे यांनी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांचे लक्ष वेधून त्यांच्यापुढे लाभ क्षेत्रातील परिस्थिती मांडून गोदावरी कालव्यांना ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्याची मागणी केली होती. कालव्यांना पाणी सोडल्यास भूजलपातळी वाढण्यास मदत होवून शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी उपलब्ध होईल. अडचणीच्या काळात हेच पाणी खरीप पिकांना देता येईल व शेतकऱ्यांना आपले खरीप पिक वाचविता येणार असल्याचे सांगितले होते.

# मटन मार्केटसाठी स्वतंत्र जागा द्यावी

## नामदार विखेंकडे लोणी खुर्द ग्रामस्थांची निवेदनाद्वारे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोणी खुर्द गावामध्ये चिकन, मटन मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ आणि जनसेवा मंडळाच्या वतीने पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी आणि जनसेवा मंडळाच्या युवक कार्यकर्त्यांनी मंत्री विखे पाटील यांची भेट घेवून त्यांना या गंभिर समस्येची माहीती देवून, संबधितांवर कडक कारवाई व्हावी, अशी मागणी केली. याबरोबरीनेच लोणी खुर्द गावामध्ये चिकन, मटन मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करुन द्यावी, तसेच हा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांना नियमांचे बंधन घालण्याबाबतचे आदेश प्रशासनाच्या माध्यमातून द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे.



काही दिवसांपूर्वी लोणी खुर्द गावामध्ये चिकन विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकाकडून घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी एकत्रित येवून या विरोधात ग्रामपंचायत तसेच पोलिस प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. सकल हिंदु समाजाच्या वतीने भव्य मोर्चाही काढून संबधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. याप्रसंगी श्रीकिसन आहेर, डॉ.सुनिल आहेर, सुधिर आहेर, सचिन आहेर, राहुल घोगरे, साहेबराव आहेर, सुहास घोगरे, किरण दत्तात्रय आहेर, विजय मापारी, जालिंदर आहेर, बंटी घोगरे, सुधाकर आहेर, मनोज लोखंडे, अमोल तुपे, संदिप घोगरे, किरण किसन आहेर, संजय आहेर, प्रतिक कदम, अनिल जाधव, संदिप आहेर, जालिंदर मापारी, मुन्ना ब्राम्हणे, योगेश आहेर आदिंचा या शिष्टमंडळात समावेश होता.

# सलाबतपूर परिसरात लंपी रोगाचा उद्रेक

## जनावरांचा जीव धोक्यात, शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील सलाबतपूर मंडळ परिसरात जनावरांमध्ये लंपी त्वचा रोगाचा झपाट्याने फैलाव होत असून, शेतकरी आणि पशुपालक यांच्यावर मोठा आर्थिक व मानसिक ताण निर्माण झाला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील या परिसरात लंपी रोगाच्या प्रादुर्भावाने जनावरांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी दिघी रोड व आजूबाजूच्या गावांमध्ये पाहणी करत जनावरांमध्ये आढळणाऱ्या लंपीच्या लक्षणांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, लंपी त्वचा रोग संसर्गजन्य असून, हा रोग गोवंशीय जनावरांमध्ये विषाणूमुळे होतो. रोग पसरल्यास जनावरांचे दूध उत्पादन कमी होते, वजन घटते, वाळके तयार होतात, ताप येतो आणि काही वेळा मृत्यू देखील होतो. यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची भीती आहे.



या रोगाचा मुख्य प्रसार डास, माशी, कीटक किंवा बाधित जनावरांच्या थेट संपर्कातून होतो. अनेक जनावरांना त्वचेवर गाठी येणे, सतत ताप, खाण्याचे प्रमाण कमी होणे आणि अंगात सूज येणे, अशी लक्षणे आढळून येत आहेत. या रोगाने प्रभावित जनावरांची उत्पादकता लक्षणीयरीत्या कमी होते.

# राहुरीत सराफाचे दुकान फोडले

## लाखों रुपयांचा मुद्देमाल नेला चोरुन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** चारचाकी वाहनात आलेल्या अज्ञात भामट्यांनी आज पहाटेच्या सुमारास राहुरी शहरातील भर बाजार पेठेतील सराफ व्यावसायिक राजेंद्र भन्साळी यांचे सोन्याचे दुकान फोडून लाखों रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. त्यामुळे राहुरीत एकच खळबळ उडाली आहे.

राजेंद्र सुरजमल भन्साळी यांचे राहुरी शहरातील जुनीपेठ येथील राहुरी मेडिकल समोर वर्धमान ज्वेलर्स नावाचे सोने, चांदीचे दुकान आहे. राजेंद्र भन्साळी हे काल रात्री नेहमी प्रमाणे दुकान बंद करून घरी गेले होते. आज सकाळी ६.३० वाजे दरम्यान भन्साळी यांचे दुकानचे शटर थोडे उघडे दिसले. दरम्यान एका पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून आलेल्या अज्ञात भामट्यांनी पहाटे अडीच वाजेदरम्यान प्रथम भन्साळी यांच्या दुकान समोरील सीसीटिव्ही कॅमेऱ्यावर स्प्रे मारला. नंतर शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. दरम्यान भामट्यांनी दुकानात उचकापाचक करून ड्रावरमधील सुमारे २५ ते ३० तोळे सोन्याचे दागीने व सुमारे २५ किलो चांदीचे दागीने चोरुन नेले. तसेच दुकानातील सीसीटिव्ही कॅमेऱ्याचे डिव्हीआर घेऊन गेले.



घटनेची माहिती मिळताच पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. त्यानंतर अहिल्यानगर येथील ठसे तज्ञ व श्वान पथकाने घटनास्थळी येऊन आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी सिमा नामक श्वान जागेवरच घुटमळले. त्यामुळे तपास कामात अडचणी निर्माण झाल्या.

# गट व गण रचना जुन्याच स्वरुपात ठेवावी

## खा. नीलेश लंके यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील गट व गण रचना २०१७ साली अस्तित्वात असलेल्या जुन्याच स्वरुपात कायम ठेवावी, अशी जोरदार मागणी खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, २०१७ साली ज्या गट व गण रचनेच्या आधारे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका पार पडल्या, त्या रचनेमध्ये त्यानंतर कोणताही नविन गट अथवा गण समाविष्ट करण्यात आलेला नाही. परिणामी, नव्याने कोणतीही फेररचना करण्याची आवश्यकता नाही.

या निवेदनात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला येऊन चिंता व्यक्त केली आहे की, गट व गण रचनेच्या प्रक्रियेमध्ये राजकीय हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे निवडणुकांच्या पारदर्शकतेवर व निष्पक्षतेवर परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे गट व गण रचनेत कोणतेही बदल न करता ती २०१७ मधील जुन्याच स्वरुपात ठेवावी, ही ठाम मागणी करण्यात आली आहे.



खासदार लंके यांनी असा दावा केला आहे की, गट व गण रचनेत कोणताही बदल न केल्यास जिल्ह्यातील सामाजिक समता व राजकीय स्थैर्य टिकून राहील. कोणत्याही वर्ग अथवा गटावर अन्याय होणार नाही याची प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, अशी अपेक्षा या माध्यमातून व्यक्त करण्यात आली आहे.

# स्व. कोल्हेंसारख्या रत्नामुळे सहकाराला दिशा

## गोपी गिलबिले; सहकार वर्षानिमीत्त एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** सहकार हा जागाचा आत्मा आहे. सहकारातून अशक्यप्राय गोष्टी शक्य झाल्या, विकासरूपी संस्था उभ्या राहिल्या. परमेश्वराने या भुतलावर माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या रूपाने सहकाराचा नांवलौकीक वाढविण्यासाठी कर्मरत्न जन्माले घातले त्यातून त्यांनी परिसराबरोबरच राज्याचे सहकारवैभव देशात नावारूपाला आणले, असे प्रतिपादन व्यक्तीमत्व विकास केंद्राचे संस्थापक, अभियंते गोपी गिलबिले यांनी केले.

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमीत्त एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याचे उदघाटन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनराव कोल्हे यांनी केले. याप्रसंगी गिलबिले बोलत होते. अध्यक्षपदावरून बोलताना बिपीनराव कोल्हे म्हणाले की, माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी परदेशात उच्च शिक्षण घेतले तरी येथील मातीशी असलेली नाळ कधी सोडली नाही. संजीवनी नावाचे वैभव त्यांनी उभे केले त्याची फळे आपण चाखतो आहे. भविष्यातील बदल, तंत्रज्ञान, प्रगलभता आणि त्यातुन नवनविन निर्माण होणारी आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी युवानेते विवेक कोल्हे व त्यांचे सर्व संचालक मंडळ कार्यरत आहे. याप्रसंगी संचालक अमृत संजीवनीचे अध्यक्ष पराग संधान, विश्वासराव महाले, त्रंबकराव सरोदे, ज्ञानदेव औताडे, बाळासाहेब वक्ते, सतिष आव्हाड, रमेश घोडेराव, ज्ञानेश्वर होन, बाळासाहेब पानगव्हाणे, संजयराव औताडे, ज्ञानेश्वर परजणे उपस्थित होते. शेवटी उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे यांनी आभार मानले.

### संस्थेसाठी झोकून काम करावे

गोपी गिलबिले म्हणाले की, संस्था आपल्यासाठी काम करते, तेंव्हा तिच्या उत्कर्षासाठी कामगार या नात्यांने आपणही तितकेच योगदान दिले पाहिजे. प्रत्येकामध्ये आत्मविश्वास आहे तो फक्त जागृत करा आणि संस्था स्वतः:च्या बळावर पुढे नेण्यासाठी झोकुन देवून काम करा. स्वतःमध्ये बदल घडवा. कामावर निष्ठा ठेवा. शालेय शिक्षणाबरोबरच जीवन शिक्षणाला महत्व द्या, योग्यता तयार होते. इतरांना दिसण्यासाठी एक आणि स्वतःसाठी एक असे वागू नका. जे कानांत आत्मसात केले तर मनांत उतरवा आणि तेच आचरणांत आणा.




## संपादकीय

### अनपेक्षित मैत्री


अफगाणिस्तानातील तालिबान सरकारला मान्यता देणारा रशिया हा पहिला देश ठरला आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी तालिबानने काबूल ताब्यात घेतल्यानंतर आणि सत्तेत आल्यानंतर हे त्यांचे सर्वात मोठे राजनैतिक यश मानले जात आहे. अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी म्हणाले, की रशियाचे हे पाऊल आतापर्यंत तालिबान सरकारला मान्यता देण्याचे टाळणाऱ्या इतर देशांसाठी एक उदाहरण ठरेल अशी आशा आहे. त्यांनी रशियाच्या या निर्णयाचे वर्णन 'धाडसी पाऊल' असे केले आहे. रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे, की या निर्णयामुळे ऊर्जा, वाहतूक, शेती आणि पायाभूत सुविधांमध्ये व्यापार आणि आर्थिक सहकार्य होण्याची शक्यता आहे. रशियाच्या या निर्णयामुळे भारतासह इतर देशांचा तालिबान सरकारकडे काय दृष्टिकोन आहे, हे पाहणे बाकी आहे. हे देशही ते मान्य करतील का, असा प्रश्न आहे. तथापि, या निर्णयावर अनेक देशांनी टीका केली आहे. अफगाणिस्तानच्या माजी खासदार फौजिया कुफी यांनी मात्र रशियाच्या निर्णयावर टीका केली. अशा पावलांमुळे केवळ अफगाणिस्तानातील लोकच नव्हे, तर संपूर्ण जगाची सुरक्षा धोक्यात येऊ शकते. अफगाण महिला राजकीय सहभाग नेटवर्कने म्हटले आहे, की हे अशा शक्तीला मान्यता देते, जी हुकूमशाही राजवट चालवत आहे. ती महिलांच्या विरोधात आहे आणि सतत मूलभूत नागरी हक्कांचे उच्चाटन करत आहे. आतापर्यंत आंतरराष्ट्रीय स्तरावर तालिबानला एकटे मानले जात होते; परंतु तज्ज्ञांचे मत आहे, की रशियाच्या या हालचालीमुळे आतापर्यंत तयार झालेल्या जागतिक सहमतीत तफावत निर्माण झाली आहे. आता चीनही तालिबान सरकारला अधिकृत मान्यता देऊ शकते. भारताने तालिबानला औपचारिक मान्यता दिलेली नाही. जगभरात नेहमीच भारताची दहशतवादाला विरोध करण्याची शैली राहिली आहे. त्यामुळे तो तालिबानला मान्यता देणे शक्य नाही. भारताला अमेरिका आणि युरोपीय संघटनेशीही संबंध राखायचे आहेत. भारताच्या या सावधगिरीमागे त्याचे पाश्चात्य देशांसोबतचे व्यापक व्यापार आणि राजनैतिक हितसंबंध आहेत. मे महिन्यात भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी यांच्याशी फोनवर चर्चा केली. भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी तालिबानच्या परराष्ट्र मंत्र्यांशी बोलून सार्वजनिक निवेदन जारी करण्याची ही पहिलीच वेळ होती. भारताने काबूलमध्ये समावेशक सरकार स्थापनेचा पुरस्कार करत आहे. अलिकडच्या काही महिन्यांमध्ये भारत आणि तालिबानमधील संपर्क वाढला आहे. जानेवारीमध्ये भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईमध्ये अमीर खान मुत्तकी यांची भेट घेतली. भारताने अफगाणिस्तानशी संबंध सुधारण्यावर भर दिला आहे. ऑगस्ट २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तानमध्ये पुन्हा सत्ता काबीज केली, तेव्हा ते भारतासाठी राजनैतिक आणि धोरणात्मक धक्का म्हणून पाहिले गेले. असे वाटत होते, की भारताने अफगाणिस्तानात केलेली अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक वाया जाईल. भारताने अफगाणिस्तानमध्ये रस्ते, वीज, धरणे आणि रुग्णालये या ५०० हून अधिक प्रकल्पांवर सुमारे तीन अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. भारत एकतर तो 'मान्यता न घेता काम करा' ही नीती आणखी काही काळ चालू ठेवेल किंवा हळूहळू औपचारिक मान्यता देण्याच्या दिशेने वाटचाल करेल.

भारताचा अफगाणिस्तानशी कधीही हितसंबंधांचा संघर्ष झाला नाही. भारताने अनेक विकास प्रकल्पांमध्ये अफगाणिस्तानला मदत केली आहे. तालिबान राजवटदेखील भारताप्रती तुलनेने मऊ राहिली आहे. दोन्ही देशांमध्ये सकारात्मक प्रतिमा कायम आहे. एकूणच, अफगाणिस्तान भारतासाठी तीनही दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. पाकिस्तान देशद्रोही ठरला. भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये अफगाणिस्तानच्या मदतीला धावून आला. इस्रायल आणि अमेरिकेनेही त्यांची भूमिका बदलली. पाकिस्तान बऱ्याच काळापासून भारताविरुद्ध दहशतवादाचा शस्त्र म्हणून वापर करत आहे; परंतु तोच दहशतवाद अफगाणिस्तान सीमेवर त्याला त्रास देत आहे. आता तर पाकिस्तानमधील दहशतवादी कृत्यांची जबाबदारी अफगाणिस्तानवर फोडून मोकळा होत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी भारताने अफगाणिस्तानवर हल्ला केल्याचा आरोप पाकिस्तानने केला होता; परंतु अफगाणिस्ताननेच परस्पर खुलासा करून पाकिस्तानला तोंडघशी पाडले होते. आता अफगाणिस्तानमध्ये संयुक्त राष्ट्रात पाकिस्तानने सूड उगवला आहे;परंतु भारत मात्र पाकिस्तानच्या मदतीला धावून आला आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये दहशतवादाच्या मुद्द्यावर अफगाणिस्तानला अडचणीत आणण्याचा प्रस्ताव आला, तेव्हा पाकिस्तानने तालिबानचे विश्वासघात केला आणि ठराव पाठिंबा दिला; परंतु भारत त्याला मदत करण्यासाठी पुढे आला. भारतीय प्रतिनिधीने परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि तालिबानचे नियुक्त परराष्ट्र मंत्री यांच्यातील अलिकडच्या संभाषणाचा उल्लेख केला. संभाषणात तालिबानने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला, ज्याचे भारताने स्वागत केले. तत्पूर्वी, भारताचे परराष्ट्र सचिव आणि अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री यांच्यातील बैठकीत द्विपक्षीय आणि प्रादेशिक विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. ते म्हणाले, की भारताची अफगाणिस्तानशी दीर्घकाळापासून मैत्री आहे आणि भारत-अफगाण लोकांमध्ये ऐतिहासिक सांस्कृतिक संबंध आहेत. भारत अफगाणिस्तानमध्ये शांतता आणि स्थिरतेच्या बाजूने आहे. भारत बऱ्याच काळापासून अफगाणिस्तानच्या विकास प्रकल्पांमध्ये भागीदार आहे. काही देश दहशतवादी कारवायांसाठी अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर करत आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की आजकाल अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये तणाव आहे. शाहबाज शरीफ सरकार आरोप करत आहे, की पाकिस्तानी तालिबानसारख्या अनेक दहशतवादी संघटना पाकिस्तानमध्ये दहशतवादी हल्ले करण्यासाठी अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर करत आहेत. अलिकडेच पाकिस्तानातील उत्तर वझिरिस्तानमध्ये अशाच एका दहशतवादी हल्ल्यात १५ सैनिक ठार झाले होते. गुल बहादूर गटाने त्याची जबाबदारी स्वीकारली होती. सीमावर्ती भागात पाकिस्तानी आणि तालिबानी सैनिकांमध्ये अनेक चकमकीही घडल्या आहेत. अशा परिस्थितीत भारत तालिबानला राजमान्यता देण्याची शक्यता आहे.

# पुन्हा वादाचा मुद्दा

**दृष्टीकोन**
**– प्रा. अशोक ढगे**

सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद या शब्दांबद्दल नुकतेच स्पष्ट मत व्यक्त केले असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसाबळे यांनी संविधानाच्या प्रस्तावनेतून धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद हे दोन शब्द वगळण्याची मागणी केली आहे. संघाची मागणी म्हणजे भाजपसाठी अलिखित आदेश असतो. होसाबळे यांची सूचना भाजप अंमलात आणणार का, हा खरा प्रश्न आहे.




संविधानाच्या प्रस्तावनेत ४२ व्या दुरुस्तीने समाविष्ट केलेल्या 'धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद' या शब्दांवर राजकीय चर्चा आणि पुनर्विचार करण्याच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांनी केलेल्या सूचनेमुळे राजकीय वादळ निर्माण झाले. काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी संघ आणि भारतीय जनता पक्षावर संविधान बदलायला निघाल्याचा आरोप केला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या मागणीला संविधानाची जागा मनुस्मृतीला देण्याचे षड्यंत्र म्हटले. संविधान सभा ही मत व्यक्त करण्यासाठी एक प्रयोगशाळा होती. तिला चर्चेचा सुवर्ण अध्यायदेखील म्हणता येईल. कोणावरही काहीही लादले गेले नाही किंवा कोणालाही थांबवले गेले नाही. नको असलेल्या गोष्टी संयमाने ऐकल्या गेल्या.

चर्चेला तीन आयाम असतात– तथ्य, तर्क आणि संयम. खासदार एच. व्ही कामत यांनी संविधानात 'देव' हा शब्द जोडण्यासाठी दुरुस्ती मांडली. त्यावर शांततापूर्ण चर्चा झाली आणि मतदानही झाले. अशी डझनभर उदाहरणे आहेत. हेतूसोबतच चर्चेसाठी स्व-अभ्यास, चिंतन आणि जाणीव आवश्यक आहे. त्याच्या पतनामुळे चर्चेची संस्कृती संपते. होसाबळे यांनी म्हटले ते संविधान सभेत प्रतिबिंबित होते. के. टी. शहा हे संविधान सभेतील एक प्रमुख सदस्य होते. त्यांनी प्रस्तावनेत 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवाद' हे शब्द जोडण्यासाठी एक दुरुस्ती प्रस्तावित केली होती. ती फेटाळण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, की समाजवाद हा शब्द अप्रासंगिक आहे आणि राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे समानता सुनिश्चित करणाऱ्या, शोषणमुक्त असलेल्या आणि श्रमाचा आदर करणाऱ्या तरतुदींनी परिपूर्ण आहेत. त्यांनी म्हटले होते की आणखी किती समाजवादाची आवश्यकता आहे? समाजवाद ही एक विशिष्ट प्रकारची विचारसरणी आहे. पिढ्या एकाच आर्थिक कल्पनेने बांधल्या जाऊ शकत नाहीत. आर्थिक तत्वज्ञानाचा शोध वेळ, संदर्भ आणि आवश्यकतांनुसार घेतला जातो. भारतीय समाज समानतेच्या बाजूने आहे. म्हणूनच, सामाजिक-आर्थिक कमतरतांविरुद्ध असलेल्या व्यक्ती किंवा संघटनेला नैसर्गिक स्वीकृती मिळत आली आहे.

हिंदू जीवनशैली जितकी प्रवाही आणि दोषांपासून मुक्त असेल तितकीच धर्मनिरपेक्षता मजबूत आणि प्रभावी असेल. भारताचा विचार करण्याचा, समजून घेण्याचा आणि परिभाषित करण्याचा त्यांचा अधिकार केवळ एका काळातील एका पिढीच्या विचारसरणी, समज आणि व्याख्येपुरता मर्यादित राहू शकत नाही. डॉ. आंबेडकर यांनी ही भावना संविधान सभेत अनेक वेळा व्यक्त केली होती. जगातील सर्वात मोठ्या समाजवादींपैकी एक असलेले जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्यानंतर देशाचे पहिले पंतप्रधान बनले. त्यांनी संविधानाच्या निर्मितीतही महत्त्वाची भूमिका बजावली, तरीही त्यांनी या शब्दापासून बरेच अंतर ठेवले. स्वातंत्र्यानंतर, नेहरूंच्या नेतृत्वाखाली देश समाजवादी पद्धतीने विकसित झाला, हे स्पष्ट आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यापेक्षा नेहरूंना समाजवादाबद्दल विशेष ओढ होती. देशात मोठ्या सरकारी कंपन्यांची स्थापना करण्याच्या प्रवृत्तीतून समाजवादाबद्दलची त्यांची ओढ स्पष्टपणे दिसून येत होती. देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर इंदिरा गांधींनीही देशाला समाजवादी मार्गाने चालवणे चांगले मानले. आणीबाणीच्या काळात त्यांनी स्वस्त लोकप्रियता मिळविण्यासाठी संविधानाच्या प्रस्तावनेत धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे शब्द जोडले असावेत. इंदिरा गांधी जागतिक समाजवादी चळवळींपासून, विशेषतः सोव्हिएत मॉडेलपासून प्रभावित होत्या; पण जागतिकीकरण, उदारीकरण आणि सामाजिक-राजकीय बदलांमुळे समाजवादाचीच प्रासंगिकता संपुष्टात येण्यास फार वेळ लागला नाही.

राज्यघटनेत 'धर्मनिरपेक्ष-समाजवादी' जोडणे जितके निरर्थक होते, तितकेच ते काढून टाकण्याची संघाची मागणीदेखील निरर्थक आहे. आता समाजवादाच्या नावाखाली बनवलेले सर्व कायदे रद्द करण्यात आले आहेत; परंतु निवडणुका जिंकण्यासाठी देशात गरिबी निवारण योजनांवर जितका पैसा खर्च केला जात आहे, जो इंदिरा आणि नेहरूंच्या काळातही कधीच केला गेला नव्हता. याचा अर्थ असा, की फक्त समाजवाद या शब्दाचा वापर टाळला जात आहे, धोरणांचा वापर नाही. म्हणजेच दारू तीच आहे, फक्त बाटली बदलली आहे. आज १९७० च्या दशकात जन्मलेले लोक त्यांच्या मध्यम वयात असतील. हे दशक त्या काळाची साक्ष आहे, जेव्हा देश अतिरेकी समाजवादी कायद्यांच्या बंधनात अडकला होता. देशाची अर्थव्यवस्था दोन ते तीन टक्के वाढीच्या दरम्यान झुलत होती. देशातील सरकारांकडे समाजवादी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी पैसे नव्हते. कारण भांडवलाच्या विकासाशिवाय देशातील गरिबांसाठी मोफत योजना राबवणे शक्य झाले नसते. स्कूटर आणि सिमेंट खरेदी करण्यासाठी परवाना घ्यावा लागत होता. साखर आणि रॉकेलचे रेशनिंग होते. म्हणजेच, एक कुटुंब दोन किलोपेक्षा जास्त साखर खरेदी करू शकत नव्हते. त्याचप्रमाणे, रॉकेलचे वाटपदेखील निश्चित होते. सरकारी नोकऱ्या नव्हत्या आणि रोजगारासाठी खासगी क्षेत्र नव्हते. पकोड्याचा स्टॉल उघडूनही कुटुंब चालवणे कठीण होते. आयुर्मान ५० पेक्षा कमी होते. खासगी रुग्णालये विकसित झाली नव्हती किंवा खासगी शाळा आणि महाविद्यालये उघडता येत नव्हती.

भारताच्या १९९१ पर्यंतच्या अर्थव्यवस्थेची स्थिती सर्वांसमोर होती. देशाकडे महिनाभरासाठीही आवश्यक परकीय चलन नव्हते. सोने गहाण ठेवून देश कसा तरी चालवला जात होता. त्याच काळात नरसिंह राव आणि मनमोहन सिंग यांनी आर्थिक उदारीकरणाचे धोरण अंगीकारले. राजीव गांधींच्या हत्येनंतर राव पंतप्रधान तर मनमोहन सिंग अर्थमंत्री झाले. या दोघांनी रचलेल्या उदारमतवादी अर्थव्यवस्थेच्या पायावर आज देश जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. लवकरच आपण जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहोत. राव आणि सिंग समाजवादी कायदे काढून टाकण्यात आघाडीवर होते. १९९१ मध्ये भारतात सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांमध्ये समाजवादी धोरणे कमकुवत करण्याची कोणतीही संधी सोडली नाही. या सुधारणांद्वारे त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला समाजवादी रचनेतून बाहेर काढून बाजाराभिमुख आणि जागतिकीकृत मॉडेलकडे आणले. अर्थात, समाजवादी कायदे आणि धोरणे काढून टाकल्याशिवाय हे होणे शक्य नव्हते. देशाची अर्थव्यवस्था परवाना राज, सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व आणि प्रचंड सरकारी नियंत्रणाखाली होती. या संकटाला तोंड देण्यासाठी सिंग यांनी अर्थमंत्री म्हणून डझनभर आर्थिक सुधारणा केल्या.

पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी परवाना राजचा अंत केला. त्या अंतर्गत खासगी उद्योगांना व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा विस्तारण्यासाठी सरकारी परवानगीची आवश्यकता होती. ही व्यवस्था १९५० ते ६० च्या दशकापासून अस्तित्वात होती आणि संसाधनांचे समान वाटप आणि औद्योगिक मक्तेदारी रोखण्यासाठी होती. राव आणि सिंग यांनी तोट्यात चालणाऱ्या अनेक सरकारी कंपन्यांचे खासगीकरण सुरू केले. खासगी आणि परदेशी गुंतवणुकीसाठी अनेक क्षेत्रे खुली करण्यात आली. दूरसंचार आणि वीजेसारख्या क्षेत्रात खासगी सहभागाला प्रोत्साहन देण्यात आले. सिंग यांनी थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा वाढवली. विशेषतः विमा, किरकोळ विक्री आणि उत्पादन यासारख्या क्षेत्रात मर्यादा वाढवली. व्यापार धोरणांचे उदारीकरण करण्यात आले आणि भारताने जागतिक व्यापार संघटनेशी एकीकरण स्वीकारले. कठोर कामगार कायदे रद्द करण्यात आले. हे खरे असले, तरी याच सिंग यांच्या कारभारावर भाजपने टीकेची झोड उठवली होती. आता ते धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद हे दोन शब्द काढून टाकण्यासाठी प्रयत्नशील असले, तरी सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या प्रस्तावनेतून हे दोन शब्द वगळण्याची आवश्यकता नाही, असे म्हटले आहे. आता भाजप संघाची सूचना अंमलात आणणार का आणि त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे मत दुर्लक्षून घटना दुरुस्ती करून हे दोन शब्द वगळणार का, हे पहावे लागेल.

पान १ वरून

पान १ वरून

पान १ वरून

## शिवरायांच्या गडकिल्ल्यांचा प्रस्ताव मंजूर!

देवेंद्र फडणवीस म्हणाले.

सीएसटीएमच अतिभव्य स्टेशन तयार करण्याच काम सुरु आहे. तिथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य दिव्य पुतळा बसवला जाणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने याचा आधीच विचार केला आहे. नाना जगन्नाथ शंकर शेठ यांचं नाव मुंबई सेंट्रल स्टेशनला द्यावं, असा प्रस्ताव एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना पाठवला आहे. निर्णयासाठी हा प्रस्ताव त्या ठिकाणी आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## शिवसेना पक्ष, धनुष्यबाणावर होणार फैसला?

स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असल्यामुळे या प्रकरणी आजच सुनावणी घ्या, असा आग्रह धरला. पण कोर्टाने आज प्रकरण ऐकण्यास स्पष्ट नकार दिला. या प्रकरणी पुढील महिन्यात एखादी जवळची तारीख दिली जाईल, असे कोर्ट म्हणाले.

**नवी तारीख एक-दोन दिवसांत कळवणार**

वकील सिद्धार्थ शिंदे यांनी याविषयी बोलताना सांगितले की, सुप्रीम कोर्टाने शिवसेना पक्ष व चिन्हाबाबत एक मोठे विधान केले आहे. कोर्ट म्हणाले की, हे अर्ज वगैरे दाखल करणे आता बंद करा. प्रस्तुत प्रकरण २ वर्षांपासून प्रलंबित आहे. त्याचा निकाल किंवा मुख्य सुनावणी आपण ऑगस्टमध्ये घेऊ. त्यावर ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी ऑगस्ट महिन्यातील तारीख मागितली. त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी आपण आपले रोस्टर पाहून ऑगस्टमधील एखादी तारीख देतो, ती तुम्हाला एक-दोन दिवसांत कळवण्यात येईल असे सांगितले.

त्यानुसार ऑगस्टमध्ये या प्रकरणाची सुनावणी होईल. त्यानंतर निकाल राखून ठेवला जाईल. जर ऑगस्टमध्ये सुनावणी झाली तर शिवसेना पक्ष व चिन्हाचा निकाल सप्टेंबर, ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये लागू शकतो. आता ऑगस्टमध्ये ही केस पुन्हा बोर्डावर येईल. त्यावर सुनावणी होईल. पण आज सुप्रीम कोर्टाने एक ठळक सांगितले आहे की, आता २ वर्षे झाली आहेत आणि आता आम्हाला या मॅटरचा सोक्षमोक्ष लावायचा आहे. आता पुढील महिन्यात होणाऱ्या सुनावणीत पक्ष व चिन्ह एकनाथ शिंदेंबरोबरच राहील की ते परत उद्धव ठाकरे यांना दिले जाईल.

या मधल्या काळात निवडणुका लागल्या तर सध्या आहे तीच परिस्थिती राहील. पण ऑगस्ट किंवा त्यापुढील दोन महिन्यांत निकाल आला तर स्थिती स्पष्ट होईल. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचा प्रयत्न हे प्रकरण ऑगस्ट महिन्यातच निकाली निघेल असा राहील, असे शिंदे यांनी सांगितले.

शिंदे गटाच्या वकिलांनी यावेळी ठाकरे यांच्या याचिकेला कडाडून विरोध केला. याचिकाकर्त्यांनी ही याचिका आत्ताच का दाखल केली? ते मागील २ वर्षांपासून झोपा काढत होते का? असा प्रश्न उपस्थित केला. पण कोर्टाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. आतापर्यंत जे झाले ते झाले. आता २ वर्ष संपलेत. आम्हाला याचा सोक्षमोक्ष करावाच लागेल, असे कोर्ट म्हणाले. त्यामुळे या प्रकरणाचा निकाल पुढील ३ महिन्यांत अपेक्षित आहे, असे सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे यांना मोठा दिलासा

वकील सिद्धार्थ शिंदे पुढे बोलताना म्हणाले, काल सुप्रीम कोर्टाने केलेले विधान हे उद्धव ठाकरे यांना मोठा दिलासा मिळाला असेच म्हणावे लागेल. कारण, मागील २ वर्षांपासून जी अनिश्चितता होती ती आता सुप्रीम कोर्टानेच दूर केली आहे. कोर्टाने स्वतःच या प्रकरणी ऑगस्ट महिन्यातील तारीख देण्याची घोषणा केली आहे. त्यात एक-दोन दिवस सुनावणी चालेल, सुनावणी तहकूब होईल. पण चालू वर्षाच्या आत हे प्रकरण निकाली निघेल हे नक्की.

## ... आता प्रश्न सोडविण्यासाठी नवी यंत्रणा कार्यान्वित

येणाऱ्या बातम्यांमुळे सरकारची प्रतिमा मलिन होते. त्यामुळे त्या विभागाच्या सचिवांनी लगेच खुलासा करुन सरकारची बाजू मांडण्याबाबतचा शासन आदेश यापुर्वीच काढला आहे. त्याच धर्तीवर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा प्रशासनाकडूनही शासनाच्या योजना, नागरिकांच्या प्रश्नाबाबत तसेच सार्वजनिक विकास कामांच्या संदर्भात विरोधी येणाऱ्या वृत्ताची दखल व्यक्तिगत स्तरावर मंत्री विखे पाटील यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. एखाद्या विभागाचे नागरिकांच्या समस्यांकडे होणारे दुर्लक्ष, सार्वजनिक प्रश्नांची समस्या तसेच लोकांसाठी असलेल्या योजनांबाबत शासनाकडून होणारी अडवणूक याबाबत दैनंदिन वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द होत असतात. या बातम्यांची दखल घेवून, संबधित विभागाला त्याबाबत स्वत: पालकमंत्री बातमीच्या कात्रणासह पत्र पाठवून त्याचा खुलासा मागवून किंवा समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश देत आहेत.

मागील तीन महिन्यापासून सुरू केलेल्या या नव्या पॅटर्नमुळे संबंधित विभागांना त्यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाचा खुलासा किंवा वृत्तपत्रात आलेल्या बातमीबाबत म्हणणे मांडण्याची संधी मिळाली आहे.

## धर्मांतरविरोधी कायदा लागू होणार

अहवाल येणार आहे.

तसेच शिवसेना नेत्या मनीषा कायंदे यांनी प्रश्न उपस्थित केला की देशातील १० राज्यांमध्ये धर्मांतर विरोधी कायदा लागू करण्यात आला आहे, आपल्या राज्यात लागू होणार का? यावर पंकज भोयर म्हणाले ११ वे राज्य हे महाराष्ट्र असणार आहे आणि अतिशय कडक कायदा केला जाणार आहे.

## निवडणुकीसाठी कामाला लागा

नुकतीच राष्ट्रवादी अजित पवार गटाची बैठक पार पडली, या बैठकीमध्ये बोलताना अजित पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. त्यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. निवडणुकीच्या कामाला लागा, निवडणुकीचा जो निर्णय होईल तो होईल, आपण आपली प्रत्येक प्रभागात तयारी करा. पुण्यात आपल्याकडे संख्याबळ चांगलं आहे, प्रत्येक प्रभागापर्यंत पक्ष पोहोचवा सदस्य नोंदणी करा, मी स्वतः पुण्यात पक्षात लक्ष घालेन, ऑगस्ट महिन्यात मी सगळा आढावा घेणार आहे, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान दुसरीकडे त्यांनी नवीन शहराध्यक्षांना कार्यकारिणी तयार करण्याच्या सूचना देखील दिल्या आहेत.

दुसरीकडे भाजपनं देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. मुंबई महापालिकेक महायुतीचाच महापौर होईल, उत्तर मुंबईमधून कमीत कमी ३८ नगरसेवक निवडून आणण्याचं आमचं लक्ष्य आहे. आम्ही मुंबई महापालिका निवडणुकीबाबत उत्सुक आहोत, अशी प्रतिक्रिया भाजप नेते पियुष गोयल यांनी दिली आहे. शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या निलम गोऱ्हे यांनी देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुतीतच होतील असं म्हटलं आहे.

## राज ठाकरेंविरोधात डीजीपींकडे तक्रार?

निघाला. गुजरात्याला मारलं का. किती व्यापारी आहे. अजून तर काही केलं नाही. त्यांना मराठी आली पाहिजे. यात वाद नाही, ऊठसूट मारायची गरज नाही. पण जास्ती नाटकं केली तर कानाखाली आवाज काढला पाहिजे, असे राज ठाकरे म्हणाले होते.

पुढे ते म्हणाले होते की, पण चूक त्यांची असली पाहिजे. अशी कधी गोष्ट कराल तर त्याचे व्हिडीओ काढू नका. आपल्या आपल्यातच त्यांना कळलं पाहिजे. कळलं का? मारणारा कधी सांगणारा नसतो. मार खाणारा सांगतो. मला मारलं. त्यांना सांगू देत. पण ऊठसूट कुणाला मारू नका. अनेक लोक आहेत. माझ्या परिचयाचे आहे. माझा मित्र आहे, नयन शाह. मी त्याला गुजराठी म्हणतो. तो अप्रितम मराठी बोलतो. पण विनोदाचं अंग आहे. शिवाजी पार्कात हेडफोन लावून पुलं देशपांडे ऐकणारा गुजराती आहे. मराठीचं हे बाळकडू आमच्यासाठी बाळकडूच होतं. पण आता त्यांच्या या वक्तव्याविरोधात डीजीपींकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## मोदींचे डीबीटीचे स्वप्न कधी पूर्ण होणार?

अध्यक्ष महोदय तीन-साडे तीन हजार रुपयांच्या फरकाने आपण पेट्या खरेदी करतो आणि जे काही निकष आहेत टेंडरचे ते ठराविक लोकांनाच टेंडर मिळावे, असे निकष आखण्याचे काम गेले अनेक वर्ष चालू आहे.

जयंत पाटलांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टोला लगावला आहे. ते म्हणाले, मला एका गोष्टीचे समाधान आहे की जयंत पाटलांना मोदी साहेबांच्या सगळ्या योजना आवडायला लागल्या आहेत. आणि मोदी साहेबांच्या योजना लागू करा, असा आग्रह हा देखील मला अतिशय स्वागतार्ह वाटतो, असे म्हणत फडणवीसांनी जयंत पाटलांना टोला लगावला आहे.

पुढे देवेंद्र फडणवीस म्हणाले, हे जे प्रकरण आहे यात कामगारांच्या हिताचे काय आहे, पण आपण जे सांगितले आहे एजंट तयार झाले आहेत, तर माननीय मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी तयार करून या योजनेत जास्तीत जास्त कसे पारदर्शकपणा आणता येईल या संदर्भातला प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे.

मोदींचे डीबीटीचे स्वप्न कधी पूर्ण होणार?

अध्यक्ष महोदय तीन-साडे तीन हजार रुपयांच्या फरकाने आपण पेट्या खरेदी करतो आणि जे काही निकष आहेत टेंडरचे ते ठराविक लोकांनाच टेंडर मिळावे, असे निकष आखण्याचे काम गेले अनेक वर्ष चालू आहे.

## युथ वॉरियर कप स्पर्धेत अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमी ठरली प्रथम क्रमांकाची मानकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नुकत्याच पुणे येरवडा येथे झालेल्या युथ वॉरियर कप निमंत्रित राज्यस्तरीय कराटे स्पेर्धेमधे अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या ३६ खेळाडूंनी सहभाग नोंदाविला असून स्पर्धेत सर्वच खेळाडूंनी अनेक पदकांची लयलूट केली. कराटे स्पेर्धेमधे कुमीते व काता या दोन प्रकारात प्राविण्य प्राप्त खेळाडू

(मुली)- श्रुती भैस -सुवर्ण व रौप्य , सना शेख -२ रौप्य, जोया शेख - रौप्य, स्वामीनी सोनावणे - रौप्य, जिया पटेल - सुवर्ण व कांस्य, सान्वी साळुंके रौप्य व कांस्य, इरा साळुंके सुवर्ण व कांस्य, ग्रेसि वाघमारे-कांस्य, सांची शेणवी -२ रौप्य, हरिप्रिया भोरे- रौप्य, वैष्णवी कुटे -सुवर्ण, स्वरा कुरटे-सुवर्ण व रौप्य, खुशी कुरटे-रौप्य, आरोही अचारी- रौप्य, यशश्री बांगर- सुवर्ण पदक,

(मुले)- अरमान शेख -कांस्य, नर्हे ओंकार- रौप्य, अथर्व जाधव-सुवर्ण, प्रणव दराडे-सुवर्ण व कांस्य, रुद्रप्रताप मुळे-कांस्य, रेहान पटेल-सुवर्ण, राजवीर सारवान-कांस्य, तैमूर सय्यद-सुवर्ण, रोहन दुशिंग -२ रौप्य, साई आचारी- रौप्य, आदेश चव्हाण-कांस्य व रौप्य, स्वराज लिमन-२ रौप्य , ऋषिकेश खेडकर सुवर्ण, मयंक पवार सुवर्ण व रौप्य, समर्थ सूर्यवंशी -सुवर्ण, आदित्य पुजारी-कांस्य, अविनाश गोल्हार-सुवर्ण व कांस्य, आरव टकले-२ कांस्य, प्रदीप होडग-कांस्य, मृत्युंजय शिंदे-कांस्य, नबील पटेल-रौप्य या खेळाडूंनी पदके मिळवून अहिल्यानगर शहराचे नाव सर्वत्र मोठे केले आहे.

# विखे कुटुंबाच्या माध्यमातून समाजाची सेवा

## आ. काशिनाथ दाते; दिव्यांग बांधवांसाठी शिबीर संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** गेल्या तीन पिढ्यांपासून विखे पाटील कुटूंबीय हे सातत्याने समाजाची सेवा करतात. त्यामुळे जनतेने अपवाद परिस्थिती सोडता, विखे परिवाराचे नेतृत्व निर्विवादपणे स्विकारले, असे गौरवोदगार आ. काशिनाथ दाते यांनी काढत याच कुटुंबाच्या माध्यमातून आपण सामाजाची सेवा करीत असल्याचे सांगितले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्यावतीने आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा परिषदेच्या समन्वयाने तसेच भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर व एस. आर. ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर येथे दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आ. काशिनाथ दाते यांची



प्रमुख उपस्थिती लाभली.


आ. दाते म्हणाले की, गत पंचवार्षिक काळात दिव्यांग बांधवांसाठी संपूर्ण भारतात सर्वाधिक काम हे माजी खा डॉ. सुजय विखे पाटील यांनी वयोश्री योजनेच्या माध्यमातून केले आहे. विखे परिवार संचलित डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनद्वारे समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने सहाय्य करण्याचे काम केले जाते.

अहिल्यानगरच्या विळदघाट येथील डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय येथे दि. १५ जून ते दि १५ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्र राज्याचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ६६ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून हॉस्पिटलच्या हृदयरोग, स्त्रीरोग व नेत्ररोग विभागाच्या वतीने विविध शस्त्रक्रिया व आजारांवर औषधोपचार करण्याच्या उद्देशाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, गरजूंनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही आ. दाते यांनी यावेळी केले. शिबिरामध्ये दिव्यांग बांधवांची जागेवर तपासणी करून तात्काळ कृत्रिम अवयव साहित्यांचे वितरण करण्यात आले.

**कार्यक्रमास हे मान्यवर उपस्थित**

राज्य प्रदेश सदस्य विश्वनाथ कोरडे, दादा बोठे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, मार्केट कमिटी सदस्य शंकर नगरे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, संजय मते, युवा नेते सागर मैड, सरपंच पंकज कारखिले, लहु भालेकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. परिसरातील दिव्यांग बांधवांनीही मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभाग घेतल्याचे दिसून आले.

# ड्रोनद्वारे होणार आधुनिक जमीन मोजणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या शेतीच्या व बांधांच्या वादांना आता कायमचा पूर्णविराम मिळणार आहे. यासाठी राज्य सरकारने सरसकट आधुनिक जमीन मोजणी मोहिमेची घोषणा केली असून, या मोहिमेअंतर्गत ड्रोन आणि अत्याधुनिक यंत्रणा वापरून जमिनीचे अचूक मोजमाप होणार आहे.

विधान परिषदेच्या सभागृहात आमदार शिवाजी गर्जे यांनी या प्रश्नावर अभ्यासपूर्ण चर्चा केली. त्यांनी सांगितले की, गावात पाणी आडवायचे सोडून आता रस्तेच आडवले जात आहेत.

इंग्रजांच्या काळातील मोजणी अजूनही वापरली जाते, त्यामुळं अचूक नकाशे नसल्याने शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होतो आहे.

या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, राज्य सरकारने १२०० ड्रोन व रोव्हर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड स्कॅनिंग प्रकल्पाचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत संपूर्ण गावठाण स्कॅनिंग पूर्ण होईल. महत्त्वाचे म्हणजे, आधी मोजणी, नंतर रजिस्ट्री हे धोरण लागू होणार असून अतिक्रमण हटवण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार केला जाणार आहे.

# शनिवारच्या शाळेची वेळ पूर्ववत करा

## खासदार नीलेश लंके यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शनिवारी सकाळी ९ ते दुपारी १.३० या वेळेत शाळा घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असला तरी हा निर्णय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी वाढविणाऱ्या असून त्यात तातडीने सुधारणा करून शाळा मूळ वेळेनुसार सकाळी ७.३० ते ११.३० अशी करण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी खासदार नीलेश लंके यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



ग्रामीण पालकांची अडचणी खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे की, नगर जिल्ह्यातील बऱ्याच प्राथमिक शाळा या खेडयांमध्ये, वाडया-वस्त्यांवर आणि शेतकरी समाजाच्या मुख्य वास्तव्याच्या भागात आहेत. येथील पालकांपैकी बहुसंख्य पालक दुपारी शेतात मजुरी किंवा शेतीची कामे करत असतात. त्यामुळे शाळेची वेळ जेंव्हा ९ ते १.३० अशी ठेवली जाते, तेंव्हा विद्यार्थ्यांना शाळेत सोडणे व परत आणणे हे पालकांसाठी कठीण व गैरसोयीचे ठरते. तसेच अनेक ठिकाणी वाहतूक व्यवस्थेचा अभाव, सार्वजनिक वाहनांची अनुपलब्धता आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे लहान मुलांची शाळेतील नियमित उपस्थितीही कमी हेते अशी वस्तुस्थिती अनेक शाळांमधून दिसून येत आहे.

# विविध योजनेत जिल्हा आघाडीवर : शालिनीताई विखे पाटील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** महायुती सरकारने सुरू केलेल्या लोक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणीत शिर्डी मतदारसंघ राज्यात अग्रस्थानी आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे समाजातील सर्व घटकांना योजनांचा लाभ मिळत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या वतीने शिर्डी मतदार संघातील ३४१ लाभार्थ्यांना गृह संच भांडे वितरण कार्यक्रमात विखे बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, केंद्र आणि



राज्य सरकारच्या विविध योजना या सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचे काम शिर्डी मतदार संघामध्ये विविध पदाधिकारी कार्यकर्ते आणि जनसेवा कार्यालयाचे समन्वयक हे करत असतात. यामुळे प्रत्यक्ष लाभ हा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. शिर्डी मतदार संघामध्ये मंत्री विखे पाटील आणि विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून स्वतंत्र यंत्रणा ही सुरू आहे. यामुळे शिर्डी मतदार संघात आणि अहिल्यानगर मध्ये सर्वात जास्त योजना सुरु आहे.

प्रारंभी प्रस्ताविकामध्ये विखे पाटील कारखान्याचे माजी अध्यक्ष कैलास नाना तांबे यांनी मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून विविध योजना ह्या लोकाभिमुख अनेक घराघरापर्यंत पोहोचत असल्याचे सांगितले.

**शिर्डी मतदार संघ अव्वल**

आज शेतकरी, सर्वसामान्य जनता, ऊस तोडणी कामगार शिर्डी मतदार संघातील नागरिकांसाठी अपघाती विमा, शिक्षणाच्या विविध सुविधा या निर्माण करत असताना प्रत्येक योजनेचा प्रभावी अवलंब या शिर्डी मतदारसंघांमध्ये होत आहे आणि म्हणूनच शिर्डी मतदार संघ हा विविध योजना राबवण्यात राज्यात अव्वल स्थानावर राहिला आहे.

# इंगळे यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेअंतर्गत लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेतील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील माजी विद्यार्थी प्रगती इंगळे यांची बीएएसफ या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये विकास अधिकारीपदी निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आशिष क्षीरसागर यांनी दिली आहे. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रवरा कृषी शास्त्र संस्था विविध उपक्रम राबवत असते. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मान्यवर व्यक्ती मार्गदर्शन व्याख्याने, कृषी आधारित औद्योगिक कंपनी भेटी, कार्यानुभव उपक्रम इ. उपक्रमाचा समावेश होतो.

# ‘गौतम’मध्ये फुटबॉल स्पर्धेस सुरुवात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील गौतमनगर कोळपेवाडी येथे गौतम पब्लिक स्कूलच्या फुटबॉल स्टेडियमवर सुब्रतो मुखर्जी स्पर्धेला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

नॉकआउट पद्धतीने खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील १७ वर्षांखालील मुलांचे २५ संघ, मुलींच्या गटात ४ संघ आणि १५ वर्षांखालील मुलांच्या २० संघांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, अहिल्यानगर व प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे क्रीडा संचालक व फुटबॉल प्रशिक्षक सुधाकर निलक, हॉकी प्रशिक्षक रमेश पटारे, हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र आढाव, क्रिकेट प्रशिक्षक इसाक सय्यद, शाळेच्या पर्यवेक्षिका ज्योती शेलार सर्व. हाऊस मास्टर्स मेहनत घेत आहेत.

उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना माजी आ. अशोकराव काळे म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील ही पहिली क्रीडा स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी उत्साहवर्धक ठरेल. गौतम पब्लिक स्कूल मध्ये अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना मैदानी खेळात देखील निपुण करण्यात येते. शाळेमध्ये सर्व खेळांचे योग्य मार्गदर्शन मिळावे याकडे शाळा व्यवस्थापनाचे बारीक लक्ष असते.

# शिवकालीन १२ किल्ल्यांचा जागतिक सन्मान

## कोपरगावमध्ये भाजपाचा जल्लोष साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ज्यांच्यावर उभं राहून इतिहास घडवला, अशा १२ गड-किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याची ऐतिहासिक घोषणा म्हणजे महाराष्ट्र व देशासाठी आणि प्रत्येक शिवप्रेमीसाठी अभिमानाचा क्षण आहे.

या घोषणेमुळे या किल्ल्यांचे जागतिक स्तरावर संरक्षण, संवर्धन आणि अभ्यासासाठी नवी दारे उघडली आहेत. भविष्यातील पिढ्यांना शिवकालीन वैभव प्रत्यक्ष अनुभवता यावे, यासाठी हा निर्णय अत्यंत मोलाचा आहे.

या गौरवाच्या क्षणाचे औचित्य साधून, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे आणि युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी कोपरगाव मतदारसंघात जल्लोष साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि लाडू वाटप करत नागरिकांमध्ये आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टी शहर मंडल अध्यक्ष वैभव आढाव, पूर्वमंडळ अध्यक्ष विशाल गोर्डे, पश्चिम मंडल अध्यक्ष सुनील कदम, तालुका युवा मोर्चा अध्यक्ष अमोल गवळी, बाळासाहेब नरोडे, माजी अध्यक्ष कैलासराव रहाणे, राजेंद्र सोनवणे, गोपीनाथ गायकवाड, प्रदीप नवले, भीमा संवत्सरकर, संदीप गुरुळे, प्रकाश दवंगे, सतीश रानवडे, आकाश वाजे, उपस्थित होते.

# कोरडेंच्या निवडीने विधानसभेची नांदी

## किसनराव शिंदे; पारनेरमधील बैठकीत कोरडे यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** विश्वनाथ दादा कोरडे यांच्यावर पक्षाने टाकलेला विश्वास आणि त्यांनी केलेले भाजपासाठी पारनेर तालुक्यात केलेले अतिसूक्ष्म नियोजन, यामुळे पक्षाने त्यांच्यावर पुन्हा राज्य परिषदेच्या सदस्यत्वाची दिलेली जबाबदारी ही आगामी विधानसभेची नांदीच आहे, अस म्हटल्यास वावगे ठरणार नाही, असे प्रतिपादन निघोज, कान्हुर पठार जिल्हा परिषद गटाचे भाजपचे मंडलाध्यक्ष किसनराव शिंदे यांनी केले आहे.भाजपाचे



प्रदेश कार्यकारिणी सदस्य व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य असलेले विश्वनाथ कोरडे यांच्यावर भाजपाच्या श्रेष्ठींनी राज्य परिषदेवर निवड करून निष्ठावंत कार्यकर्ता ते नेता यांचा सन्मान केला. त्यानिमित्ताने निघोज, कान्हुर पठार जिल्हा परिषद गटाचे भाजपचे मंडलाध्यक्ष किसनराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांचा भव्य सन्मान करण्यात आला.

यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष अर्जुन नवले, काशिनाथ नवले, पारनेर तालुका विक्री संघाचे माजी अध्यक्ष बाबासाहेब खिलारी हरिराम खोडदे, संतोष गायकवाड, खरेदी विक्री संघाचे व्हाईस चेअरमन प्रसादराव शितोळे, संचालक संग्राम पावडे, बाबजी येवले, कानिफनाथ ठुबे, तुकाराम येवले, पांडुरंग गाडगे, सुनील गलांडे, यश गलांडे, आनंद गांधी, रमेश गाडगे, शब्बीर इनामदार, राजू पांढरे, मंगेश खोसे, पैलवान सुभाष वराळ, विलासराव हारदे आदी उपस्थित होते.

# ग्रो-मोअरच्या सुत्रधाराचा बंगला सील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** ग्रो- मोअर इन्व्हेस्टमेंट घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार भूपेंद्र राजाराम सावळे ऊर्फ भूपेंद्र पाटील याला नंदुरबार पोलिसांनी अटक केल्यानंतर रविवारी शिर्डीत आणण्यात आले. शेकडो ठेवीदारांची फसवणूक करून पलायन केलेल्या भूपेंद्रला शिर्डीत आणून पोलिसांनी त्याचा आलिशान बंगला सील केला.

शिर्डीतील साईसंस्थानचे तब्बल १,३०० कर्मचारी आणि पंचक्रोशीतील शेकडो ठेवीदार यामुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या फसवणुकीमुळे शिर्डीत संतापाची लाट पसरली असून, नागरिकांमध्ये चीड आणि नैराश्याचे वातावरण आहे.

भूपेंद्रसह त्याचे वडील, भाऊ यासह सात जणांविरोधात नंदुरबार, शिर्डी आणि राहाता पोलिस ठाण्यांत महाराष्ट्र संरक्षण ठेवीदार अधिनियमासह विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल आहेत. मात्र, भूपेंद्र वगळता इतर आरोपी अद्याप फरार आहेत. या फसवणुकीची व्याप्ती राज्यातील अनेक जिल्ह्यात असून गुंतवणूकदार हळूहळू पुढे येत आहेत.शिर्डीचे माजी नगराध्यक्ष कैलास कोते यांनी या प्रकरणातील इतर फरार आरोपी आणि दलालांना तातडीने अटक करावी, तसेच सर्वसामान्य गोरगरीब ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये कुठे गेले याचा कसून तपास करावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

# पाथर्डीतील अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा डोके वर काढतोय; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

## वाहन चालकांची डोकेदुखी वाढली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी शहरातील प्रमुख रस्ते आणि चौकांवर पुन्हा एकदा अतिक्रमण सुरू झाल्याचं चित्र पाहायला मिळत असून, यामुळे वाहतुकीची कोंडी वाढत आहे. काही महिन्यांपूर्वी नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांनी संयुक्त मोहिम राबवून शहरातील अतिक्रमण हटवले होते. मात्र सध्या पुन्हा त्याच जागांवर टपऱ्या, हातगाड्या व अनधिकृत बांधकामांनी थोड्या थोडक्या नव्हे तर ठसठशीतपणे जागा व्यापायला सुरुवात केली आहे.

शहरातील मुख्य चौक अजिंठा चौक, नाईक चौक, कोरडगाव चौक, शेवगाव रोड, कोरडगाव रोड, अहिल्यानगर परिसर हे आधीच वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील आहेत. त्यात रस्त्यालगत टाकल्या जाणाऱ्या टपऱ्या व दुकानांच्या अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद होतो आहे. परिणामी वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी अपघातांची शक्यता वाढली असून, अनेक छोटे-मोठे अपघात घडल्याच्या घटना समोर येत आहेत.

मागील अतिक्रमण हटवण्याची



कारवाई मोठ्या गाजावाजात पार पडली होती. जेसीबी मशीन, पोलीस बंदोबस्त, नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी यांची संयुक्त कारवाई काही दिवस शहरात शिस्त आणण्यात यशस्वी ठरली होती. मात्र ही शिस्त अल्पायुषी ठरली.सध्या पुन्हा त्या जागांवर टपऱ्या व हातगाड्या उभ्या राहू लागल्या आहेत. विशेष म्हणजे काही अतिक्रमणधारक ही जागा इतरांना भाड्याने देत असून यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण होत असल्याचं बोललं जात आहे.

कल्याण - विशाखापट्टणम (निर्मल) शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग पाथर्डी शहरातून जातो. या महामार्गावर चोवीस तास वाहतूक सुरू असते. त्यामुळे या महामार्गालगतचं अतिक्रमण आणखी धोकादायक ठरतंय. फेरीवाल्यांच्या अनधिकृत अडथळ्यांमुळे अपघाताचा धोका अधिक वाढतो आहे.वाहनचालक, शालेय वाहने, दुकानदार, नागरिक सर्वांनाच या अतिक्रमणाचा त्रास होत आहे. अनेक वेळा रस्त्यांवर चालणंही कठीण होतं. शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हे रस्ते धोकादायक ठरत आहेत.रस्त्याच्या दुतर्फा सुरू असलेल्या अनधिकृत टपऱ्या, फेरीवाल्यांच्या गाड्या, व अनधिकृत बांधकामांमुळे चालणाऱ्या पादचाऱ्यांनाही रस्त्याच्या मध्यभागी येऊन चालावं लागतं.

# जनसुरक्षा विधेयक मागे घ्या

## वंचितचे ॲड. जाधव यांचा सरकारला इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** राज्याच्या पावसाळी अधिवेशनात दि. ११ जुलै रोजी मंजूर झालेल्या जनसुरक्षा विधेयकावरून राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव यांनी या कायद्याला विरोध दर्शवत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सर्व संबंधित खासदार व आमदारांवर जाहीर निषेध नोंदवला आहे.



डॉ. जाधव म्हणाले, जनसुरक्षा विधेयक कायदा संमत करून सत्ताधाऱ्यांनी लोकशाहीच्या मुळावर घाव घातला आहे. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात राज्यभर या आंदोलनाची हाक देण्यात येणार आहे.

सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, सरकारी कर्मचारी यापैकी कोणालाही शासनाच्या विरोधात आंदोलन, मोर्चा, संप, भाषण करता येणार नाही. शासनाने कुठलाही निर्णय घेतला तर तो निर्णय लोकांच्या हिताचा नसेल तर विरोध करता येणार नाही, न विचारपूस करता जेलमध्ये टाकण्यात येईल.

**– ॲड. डॉ. अरुण जाधव**

# काळे कारखान्याच्या गळीत हंगामाची तयारी सुरू

## माजी आ. काळे, आ. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली केले मिल रोलरचे पूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या ७१ व्या गळीत हंगामाची तयारी करण्याच्या दृष्टीने सर्व तयारी अंतिम टप्यात आली असून त्यादृष्टीने मिल रोलर पूजन कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संचालक प्रशांत घुले यांच्या हस्ते रविवार (दि.१२) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळप व्हावा यासाठी नवीन कारखान्याच्या माध्यमातून कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यात आली आहे. कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ सुरु करणेच्या दृष्टीने तयारी सुरु केली असून त्याची सुरुवात मिल रोलर पूजनाने करण्यात आली आहे.

याप्रसंगी कारखान्याचे व्हा. चेअरमन शंकरराव चव्हाण, संचालक दिलीपराव बोरनारे, सूर्यभान कोळपे, सुधाकर रोहोम, राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, श्रीराम राजेभोसले, राहुल रोहमारे, प्रवीण शिंदे, डॉ. मच्छिंद्र बर्डे, अनिल कदम, अशोक मवाळ, सुनील मांजरे, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, दिनार कुदळे, श्रावण आसने, गंगाधर औताडे, संचालिका वत्सलाबाई जाधव, इंदुबाई शिंदे, सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर शुगर सुनील कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, असि. सेक्रेटरी संदीप शिरसाठ, चीफ इंजिनिअर निवृत्ती गांगुर्डे, चीफ केमिस्ट सुर्यकांत ताकवणे विविध खात्यांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

भरती ॲडव्हान्स वाटप सुरु
कारखान्याच्या यंत्र सामुग्रीचे देखभाल दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच गळीत हंगामाच्या दृष्टीने ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा भरती ॲडव्हान्स वाटप सुरु करण्यात आले आहे.

# संपत वाकचौरे कृषिरत्न पुरस्काराने सन्मानित




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** तालुक्यातील वाशेरे गावचे सुपुत्र व सेंद्रिय शेतीसाठी राज्यभर महत्त्वपूर्ण चळवळ राबवणारे आदर्श शेतकरी आणि सेंद्रिय शेती तज्ञ संपतराव वाकचौरे यांना नुकतेच कृषिरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

संगमनेर येथे झालेल्या इनरव्हील क्लबच्या वार्षिक कार्यक्रमात त्यांना सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्री थोरात, नेहा सराफ, सपना नावंदर, रचना मालपाणी, वैशाली चोपडे, वैशाली खैरनार आदी उपस्थित होते. संपतराव वाकचौरे यांनी सेंद्रिय शेतीची चळवळ राज्यभर घेऊन जाण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

वाकचौरे यांना पुरस्कार मिळाल्याने पद्मश्री राहीबाई पोपेरे, सुधाकर बोराळे, डॉ. दशरथ बंगाल, जितीन साठे, भाऊसाहेब खरात, सचिन गिरी, बाळनाथ सोनवणे, कृषी अधिकारी गोरडे आदींनी अभिनंदन केले आहे.

# वैजापूर तालुक्यात डुकरांचा धुमाकूळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** तालुक्यात अनेक दिवसापासून डुकरांचा धुमाकूळ सुरू आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मका, ऊस, भुईमूग अशा अनेक पिकांचे नुकसान शेतकऱ्यांचे झाले आहे. शेतकऱ्यांनी वनविभाग अधिकारी यांना वारंवार तक्रार देऊनही त्यांनी डुकरांचा बंदोबस्त केला नाही.

# विजेच्या बाबतीत श्रीरामपूर समृद्ध होणार

## आ. हेमंत ओगले; २२०/३३ के. व्हि. वीज उपकेंद्राचे भूमिपूजन सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर येथील एमआयडीसी येथे सुमारे ५९ कोटी ६२ लक्ष रुपयांच्या २२०/३३ के. व्हि उपकेंद्राचे भूमिपूजन जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार हेमंत ओगले यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

आ. ओगले म्हणाले की, सद्यस्थितीत श्रीरामपूर तालुक्याला बाभळेश्वर आणि नेवासा तालुक्यातून वीज पुरवठा होतो. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना उच्च दाबाने वीजपुरवठा होण्यास अडचणी निर्माण होतात. अनेक ठिकाणचे ट्रांसफार्मर वारंवार ओव्हरलोड होत असल्याने शेतकरी अडचणीत सापडलेला होता. या वीज उपकेंद्रामुळे ती अडचण देखील दूर होणार आहे. त्याचबरोबर एमआयडीसी येथे नव्याने उद्योगधंदे येण्यास मदत होईल जेणेकरून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. यावेळी करण ससाणे, सचिन गुजर, बाबासाहेब दिघे, ज्ञानेश्वर मुरकुटे, सुधीर नवले, प्रमोद भोसले, अण्णासाहेब डावखर, राजेंद्र सोनवणे, रितेश रोटे, राजेंद्र पाऊलबुद्धे, कांतीशेठ पटेल, मुन्ना पठाण, प्रेमचंद कुंकूलोळ, सुनील शिरसाठ, संदीप मगर, प्रवीण नवले, के. सी शेळके यांसह आदी उपस्थित होते.

### ‘त्या’ रस्त्याचा समावेश करावा

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या विकासा आराखड्यात शिर्डी–वाकडी–श्रीरामपूर–बेलापूर मार्गे शनिशिंगणापूर रस्त्याचा समावेश करावा, अशी मागणी आ. हेमंत ओगले यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

# कत्तलीसाठी नेणाऱ्या जनावरांचा टेम्पो पकडला

### दोघांना अटक; दहा लाखाचा मुद्देमाल जप्त; टेम्पोत आढळली मृत जनावरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** खर्डा पोलिसांनी कत्तलीसाठी बेकायदेशीरपणे घेऊन जाणाऱ्या जनावरांनी भरलेला एक कंटेनर जप्त केला.



या कारवाईत पोलिसांनी टेम्पोसह त्यातील जनावरे ताब्यात घेतली असून, दोन व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खर्डा पोलिसांना गुप्त सूत्रांकडून माहिती मिळाली होती की, मोठ्या संख्येने जनावरे कत्तलखान्याकडे नेली जात आहेत. या माहितीच्या आधारे, खर्डा पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ सापळा रचला असता सोनेगाव चौकामध्ये नाकाबंदी करून गाडी किल्ला परिसरात अडवली.

पोलिसांनी टेम्पोची तपासणी केली असता, त्यात क्रूरपणे कोंबलेली लहान मोठे ९३ जनावरे आढळून आली. बारा जनावरे मृत आढळून आले. ही जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्यातील जनावरे ताब्यात घेतली. सुमारे दहा लाख अठरा हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला कंटेनर चालकालाही अटक करण्यात आली.

### अवैध गुटखा विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

# एक कोटींचा मुद्देमाल जप्त; १२ जणांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या पथकाने कोतुळ येथे छापा टाकून अवैध गुटखा विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. या टोळीकडून गुटखाचा मोठा साठा व वाहनांसह तब्बल एक कोटी एक लाख ७४ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



दोन गुटखा तस्करांसह १० आरोपींच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहे. १२ आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर अकोले पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्याविरोधातील कारवाई करण्यात आली.पोलिसांना मिळालेला गुप्त बातमी नुसार प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांच्या पथकाने ही छापा कारवाई केली या कारवाईत कोतूळ येथील नाचनठाव रोडवर असणाऱ्या एका पत्र्याच्या शेडमध्ये हिरा पान मसाला व रॉयल ७१७ तंबाखू चा मोठा अवैध साठा आढळून आला. पोलिसांनी अवैध गुटखा व्यवसायाचे तस्कर सोहेब सावीद काजी, शाहिद हुसेन लतीफ पटेल या दोघा गुटखा तस्करांबरोबर दहा आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतले असून गुन्हा दाखल केला आहे.

# ‘पारिजात’कडून विद्यार्थ्यांना साहित्यांचे वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील एकूण १३ शाळांतील ४५० गरजू विद्यार्थ्यांना पारिजात संस्था मुंबईच्या वतीने व अनिल गंभिरे यांच्या प्रयत्नातून इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वितरण करण्यात आले.



‘पारिजात मुंबई’ ही एक नोंदणीकृत संस्था असून ही संस्था दरवर्षी महाराष्ट्रातील दुर्गम भागातील गरजा लक्षात घेऊन तेथे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्याचे अविरतपणे काम करत आहे. त्यांचा हा उपक्रम ९५ जि. प. शाळांमध्ये पोहोचला असुन मराठी शाळा टिकवण्यात त्यांचा मोलाचा हातभार आहे. ही संस्था पर्यावरणदृष्ट्या देखील प्रयत्नशील असून वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनाचे महत्व मुलांना न्यात व्हावे याकरिता मुलांना स्वतः शाळेच्या परिसात १० वृक्ष लाऊन त्यांची जोपासनी करण्यास प्रोत्साहित करत आहे. त्याचबरोबर गावच्या उपलब्ध वनराई व पडीक जमिनीवर ग्रामपंचायत व सामाजिक वनिकरण विभागाच्या समन्वयाने वृक्ष लागवड करण्यास देखील प्रोत्साहित करत आहे. हा अगदी स्तुत्य उपक्रम असून याची पूर्तता शाळांनी केल्यास त्यांना पुन्हा शैक्षणिकदृष्ट्या मदत मिळणार आहे.

### ’या’ शाळेत केले साहित्याचे वाटप

शैक्षणिक साहित्य तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील अंबित, शिसवद, कोथळे, सावरकुटे, माळवाडी, खडकी खुर्द, खडकी बुद्रुक, बलठण, करटूलेवाडी (बलठण), वैतागवाडी, करवंददरा, देवाचीवाडी या एकूण १३ शाळांमध्ये करण्यात आले.

### पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत मुदत

# शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** खरीप हंगाम २०२५-२६ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या सहभागाची प्रक्रिया सुरु झाली असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ जुलै २०२५ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

शेती क्षेत्रातील नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोग या प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणे, हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी यंदा भारतीय विमा कंपनीची निवड करण्यात आली आहे.तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या योजनेचा अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक असणे अनिवार्य असून, नुकसान भरपाई मिळवण्यासाठी ई–पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे.

### तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क करा

शेतकऱ्यांनी आपल्या गावातील सहायक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कृषी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# सोमेश्वर मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी आमले

## मा. मंत्री थोरात यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर शहरातील मानाचा गणपती असलेल्या रंगार गल्ली येथील सोमेश्वर मित्र मंडळाच्या कार्यकारणीवर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड झाली असून या सर्वांचा सत्कार महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केला असून अध्यक्षपदी रोशन आमले यांची निवड झाली आहे.

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथे सोमेश्वर मित्र मंडळाच्या नवीन कार्यकारिणीचा सत्कार मा. महसूलमंत्री थोरात यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी युवक काँग्रेस अध्यक्ष डॉ. जयश्री थोरात, सोमेश्वर दिवटे, विश्वासराव मुर्तडक, किशोर पवार, आप्पासाहेब खरे, मुकुंद गरुडकर, कैलास लोणारी, अनिल काळन, अभिजीत पाटणकर उपस्थित होते.

नवीन कार्यकारणीमध्ये अध्यक्षपदी रोशन अनिल आमले, उपाध्यक्षपदी अक्षय ढोरे व अमोल डुकरे, सचिव संकेत राजेंद्र काजळे, खजिनदार देवेंद्र काळे, कैलास बोरसे, सदस्य शुभम आमले, योगेश काजळे, वैभव आमले, प्रसाद आमले, श्रीराज गोंगे, शुभम परदेशी, अमित बोरसे, कुंजन कांबळे, कमलेश असावा यांसह आदी उपस्थित होते.

सोमेश्वर मित्र मंडळाचा गणपती हा मानाचा गणपती आहे. सर्वधर्मसमभाव आणि सर्वांना सामावून घेण्याची आपली परंपरा असून यापुढील काळातही सोमेश्वर मित्र मंडळ आपली ही समृद्ध परंपरा जपत संगमनेर शहराच्या वैभवात आणखी भर घालणार आहे.

# माध्यमिक शिक्षक सोसायटीचे नामांतरण होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहराचे नामांतर झालेले असताना व शिक्षकांप्रमाणे शिक्षकेतर संस्थेचे सभासद असल्याने सोसायटीचे नामांतर अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर सहकारी सोसायटी असे नामकरण करण्याचा ठराव संतोष कानडे यांनीमांडला. या ठरावाला सर्वांनी मंजुरी दिली.जिल्ह्यातील सुमारे ११ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सभासद यांची कामधेनू असलेल्या अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सहकारी सोसायटीची ८२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोसायटीचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखालीरविवारी पार पडली.

२२ वर्षाच्या सत्ताबदलनंतर स्वाभिमानी परिवर्तन मंडळाचे सत्ताधारी संचालक मंडळाच्या या पहिल्याच वार्षिक सभेत सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.या सभेला उपाध्यक्ष अर्जुन वाळके, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुनील दानवे, उमेश गुंजाळ, राजेंद्र कोतकर, सुधीर कानवडे, संभाजी गाडे, किशोर धुमाळ, आप्पासाहेब जगताप, बालाजी गायकवाड, छबु फुंदे, साहेबराव रकटे, शिवाजी लवांडे, बाजीराव अनभुले, अतुल कोताडे, विजय पठारे, सुरज घाटविसावे, वर्षा खिलारी, वैशाली दारकुंडे, उद्धव सोनवणे, सचिन जाधव, सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे आदी उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी जिल्हा सहकारी मंडळाच्या व्ही.ए. मानकर यांनी कार्यशाळा घेऊन उपस्थितांना सहकार खात्यातील विविध तरतुदी, कलमांची माहिती व कायदे संदर्भात मार्गदर्शन केले. अध्यक्षीय सूचना संचालक महेंद्र हिंगे यांनी मांडली. सुनील दानवे यांनी त्याला अनुमोदन दिले.




अध्यक्ष अप्पासाहेब शिंदे यांनी प्रास्ताविक केले.सचिव स्वप्निल इथापे यांनी मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम केले. संस्थेच्या कामकाजाविषयीचा अहवाल वाचून मंजूर करण्यात आला. संचालक बाबासाहेब बोडखे यांनी ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे वाचन करुन पारदर्शक पध्दतीने कारभार करण्यासाठी ऑडिट रिपोर्ट सर्व सभासदांपुढे मांडण्यात आला असल्याचे सांगून ऑडिटरचा खर्च देखील कमी केले जाणार असल्याची सांगितले. तसेच २ कोटी ४७ लाख रुपये गुंतवणुक करुन राबविण्यात येत असलेल्या उत्तम जिंदगी या योजनेची माहिती दिली.सभासदांपैकी देविदास खेडकर यांनी उत्तम जिंदगी सभासदांसाठी फायद्याची कशी? व ऑडीटर खर्चा संदर्भात प्रश्न उपस्थित केला. यावर चेअरमन शिंदे यांनी शासनाच्या परिपत्रकानुसार ही योजना अमलात आणली आहे. सुधारित एनपीए, कर्जावर तरतूद, या योजनेतील सर्व रक्कम व्यवहारात राहणार असल्याची माहिती दिली. तर ऑडिटरचा १० लाखांनी खर्च कमी करण्यात आला आहे. यापुढे देखील हा खर्च कमी करुन ते पुढील अहवालात सभासदांना दिसणार असल्याचे सांगितले.

### सर्वसाधारण सभेत ठरावाला सर्वांचीच मंजुरी

उद्धवराव गायकवाड यांनी या सभेत बाउन्सरला तोंड न देता सहजपणे व्यासपीठावर सभासदांना आपले मत मांडता आल्याबद्दल संचालक मंडळाचे आभार व्यक्त केले. तर संस्था स्थापन केलेल्या संचालकांच्या माहिती अहवालात नमूद करण्याचे सूचना केल्या. भाऊसाहेब जिवडे यांनी सोसायटीत ऑनलाइन पेमेंट व्यवस्था करण्याची सूचना मांडली. भीमराज खोसे यांनी कमीत कमी खर्चात ऑडिट रिपोर्ट करण्याचे व अमोल क्षीरसागर यांनी कर्जाच्या रकमेत वाढ करण्याची मागणी केली.

चेअरमन शिंदे यांनी या सूचनांवर सकारात्मकता दर्शविली. तर पुढच्या वेळेस जास्त लाभांश देण्याचे व कर्ज वाढ करण्याचे आश्वासन दिले. यावेळी रामराव धनवटे, रामदास जंजिरे, इस्माईल शेख, संदीप पानमळकर, गणेश विखे आदींनी सभेत प्रश्न उपस्थित करून विविध सूचना मांडल्या. या प्रश्नांना संचालक मंडळाच्या वतीने समर्पक उत्तरे देऊन त्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. याप्रसंगी माजी संचालक बाळासाहेब राजळे, सुरेश मिसाळ, ज्ञानेश्वर काळे, बाळासाहेब सोनवणे, कल्याण ठोंबरे, सत्यवान थोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर कानवडे यांनी केले.

# रांधेच्या स्वामी समर्थ मंदिरात गर्दी



**जनता आवाज वत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील प्रति अक्कलकोट म्हणून प्रसिद्ध असलेल्या रांधेच्या माळवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात गुरुपौर्णिमेला अभूतपूर्व असा भाविकांच्या भक्तीचा महापूर आला होता. अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुरु पौर्णिमेच्या दिवशी पहाटे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मुर्तीला अभिषेक करण्यात आला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी दिवसभर श्री स्वामी भक्तांनी दर्शनासाठी मोठ्या हजेरी लावत मनोभावे दर्शन घेतले, तर रात्री ७ वाजता प्रसिद्ध किर्तनकार अशोक महाराज शिंदे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या जीवन कथेवर आधारित हरि किर्तन संपन्न झाले. तदनंतर मान्यवरांच्या शुभ हस्ते श्री स्वामी समर्थ महाराजांची महाआरती मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाली. या भव्य सोहळ्याचे देखणे व निटनिटके नियोजन श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अनिलराव आवारी व अध्यक्ष सुभाषराव भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली पदाधिकारी व ग्रामस्थांनी केल्याने हा सोहळा नयनरम्य वातावरणात पार पडला.

# दूधामध्ये कोट्यवधींच्या अनुदानाची अफरातफर

## बनावट दूध विक्री प्रकरणी मुख्यमंत्री कार्यालयाकडून चौकशी सुरु

**जनता आवाज वत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील काही व्यक्तींनी शासनाच्या दूध पूरक प्रोत्साहन योजनेचा गैरवापर करत, कागदोपत्री जनावरे दाखवून बनावट आणि भेसळयुक्त दूध विक्री केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे शासनाचे कोट्यवधींचे अनुदान लाटल्याचा आरोप असून, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पोपट धायतडक यांच्या तक्रारीनंतर मुख्यमंत्री कार्यालयाने याची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत.

धायतडक यांच्या म्हणण्यानुसार, पाथर्डीतील 'श्री संत वामनभाऊ दूध संकलन केंद्र' हे अस्तित्वात नसतानाही त्याच्या नावावर दूध संकलन दाखवले गेले. २१ जानेवारी २०२५ रोजी भारत



एकही दुधाळ जनावर नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

रसायनांचे मिश्रण करून बनावट दूध विक्रीचा आरोप तक्रारीनुसार, या व्यक्तींनी पावडर व रासायनिक पदार्थांच्या साहाय्याने कृत्रिम दूध तयार केले व ते प्रति लिटर ५ रुपये प्रमाणे शासनाकडून अनुदान घेऊन विकले. या प्रकारामुळे ना फक्त शासनाची फसवणूक झाली, तर लोकांच्या आरोग्याशीही थेट खेळ झाला. हे भेसळयुक्त दूध पुणे, श्रीरामपूर, अहिल्यानगर या शहरांतील दूध संकलन केंद्रांना विक्रीसाठी पाठवले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे या ठिकाणच्या केंद्रांचीही सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाने या तक्रारीची दखल घेऊन दुग्धविकास विभागाला चौकशीचे आदेश दिले आहेत. पशुधन विकास अधिकाऱ्यांनी संबंधित गोठ्यांची पाहणी केली असून, त्यात कोणतीही जनावरे नसल्याचा लेखी अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाचे कोट्यवधी रुपये लाटल्याचे स्पष्ट झाले आहे.

> खोट्या नावाखाली लाखो लिटर भेसळयुक्त दूध विक्री करून जनतेच्या आरोग्याशी खेळ, त्यावर शासनाचे कोट्यवधींचे अनुदान लाटले गेले. या प्रकरणात संबंधितांवर अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून अनुदानाची वसुली करण्यात यावी.
>
> **-अर्जुन पोपट धायतडक, सामाजिक कार्यकर्ते.**

# 'युपीआय'द्वारे १७ लाखांची फसवणूक

## दिल्ली येथील पोलिसांनी राहत्यातील तरूणास पकडले

**जनता आवाज वत्तसेवा**

**राहाता :** पुणे येथील एका महिलेच्या बचत खात्यातील आयएमपीएस (इमिजिएट पेमेंट सर्व्हिस) व यूपीआय (युनिफाईड पेमेंट इंटरफेस) या ई-बँकिंग प्रणाली द्वारे आर्थिक व्यवहार करून जानेवारी २०२३ ते मे २०२५ पर्यंत ईशान लाहिरी यांच्या पुणे वानवडी येथील ॲक्सिस बँकेच्या शाखेतील बचत खात्यातून वेळोवेळी खाते धारकाच्या माहिती शिवाय अनेक अनधिकृत व्यवहार करून सुमारे १७ लाख २५ हजार रुपये लुटल्याची व त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी राहाता येथील आरोपी आनंद विलास सोमवंशी याला दि. २५ जून रोजी ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी दिल्ली येथे नेले आहे.

पुणे येथे राहणारी ईशान लाहिरी यांची आर्थिक फसवणूक झाली आहे. त्यांचा मुलगा इंद्रजित लाहिरी, राहणार निवासस्थान ८७, दुसरा मजला, संत नगर, पूर्व कैलास, दिल्ली येथे राहतो. आपल्या आईचे बँक खात्यातून पैसे कमी होतात, कोणीतरी काढतय असे त्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याने याप्रकरणी बँकेकडे चौकशी करून स्टेटमेंट काढले असता त्यांचे लक्षात आले की, आपल्या आईची फसवणूक झाली. त्यानंतर त्याने दिल्ली पोलिसात सायबर सेलला तक्रार दाखल केली.

पोलिसांनी बँक स्टेटमेंट तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास केला असता राहाता येथील आनंद सोमवंशी याने हा प्रकार केल्याचे उघडकीस आले. त्याने आपला मोबाईल नंबर संबंधित खात्याला लिंक केल्या असल्याचे समजले. प्राथमिक तपासात सोमवंशी विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी राहाता पोलिसांच्या मदतीने आरोपी आनंद सोमवंशी याला राहत्यातून ताब्यात घेतले व पुढील कारवाईसाठी दिल्ली येथे नेले आहे.

दिल्ली पोलिसांनी आरोपी आनंद वसंत सोमवंशी याचे कडून एक फोन, महत्त्वाची कागदपत्र बँकांची पासबुक चेकबुक/डेबिट आरोपीविरुद्ध पुरेसें पुरावे मोबाईल कार्ड जप्त केले आहे. आरोपी विरोधात पोलिस स्टेशन गुन्हे शाखा, दिल्ली येथे गुन्हे दाखल झाले आहेत. त्याला न्यायालयासमोर उभे केले असता पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

# शेवगावात पुन्हा अतिक्रमण हटाव मोहीम

**जनता आवाज वृत्तसेवा**



**शेवगाव :** शेवगाव नगरपरिषदेकडून शहरातील अंतर्गत मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात येणार असून, मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी स्वतः मोची गल्लीतील रस्त्याचे मोजमाप करून दुकानदारांना सीमा ठरवून दिल्या. त्यामुळे दुकानदारांचे धाबे दणाणले असून, त्यांनी स्वतः हून अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या चार ते पाच महिन्यांपासून शेवगाव शहरातील अतिक्रमणांचा विषय प्रशासनाने विशेष लावून धरला आहे. त्यामुळे सुरुवातीला शहरातून जाणाऱ्या नगर, मिरी, गेवराई, नेवासे या प्रमुख राज्य मार्गांसह आखेगाव रस्त्यावरील अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली. त्यामुळे कधी नव्हे तो शेवगाव शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला. आता नगरपरिषद प्रशासनाने मुख्याधिकारी घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील बाजारपेठेतील रस्त्यांच्या बाजूची अतिक्रमणे काढण्याची मोहीम हाती घेतली आहे. क्रांती चौक ते शिवाजी चौक, मोचीगल्ली, वरुर रस्ता, स्व. विष्णुपंत देहाडराय चौक ते पैठण रस्ता, शिवाजी चौक ते गणपती मंदिर या रस्त्यांच्या बाजूला अतिक्रमणे करणाऱ्या व्यावसायिकांना नगरपरिषदेने नोटिसा बजावल्या. मुख्याधिकारी घाडगे कठोर भूमिका घेत रस्त्यावर उतरल्या. त्यांनी कर्मचाऱ्यांसह मोचीगल्लीतील रस्त्याचे मोजमाप घेऊन दुकानदारांना सीमा ठरवून दिल्या.

# सडे शाळेतील तीन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**जनता आवाज वत्तसेवा**

**कोपरगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,सडे येथील तीन विद्यार्थ्यांनी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग यश संपादन करून शाळेचे आणि गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. श्रुतिका वाल्मीक सहाणे (२४८ गुण), प्रणाली अण्णासाहेब कोताडे (२४६ गुण) आणि आयुष दत्तात्रय पवार (२३४ गुण) यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवत घवघवीत यश मिळवले आहे. ही कामगिरी विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि शिक्षकांच्या समर्पित प्रयत्नांचे द्योतक आहे. या यशामागे गटशिक्षण अधिकारी शबाना शेख आणि केंद्रप्रमुख विलास भांड यांचे मार्गदर्शन असल्याचे मुख्याध्यापक श्याम डोळस यांनी सांगितले. सरपंच आशा बारहाते, उपसरपंच अनिता बारहाते, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश बारहाते व सदस्य यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे वर्गशिक्षक लक्ष्मीकांत वाडिले आणि सहशिक्षक अमोल थिटे यांचाही या यशात वाटा आहे.

# राहात्यात डाळिंब ५०५ रुपये

**जनता आवाज वत्तसेवा**

**राहाता :** राहता बाजार समितीत रविवारी डाळिंबाला प्रति किलो ५०५ रुपये भाव मिळाला. बाजार समितीत डाळिंबाच्या १३,५२५ क्रेट्सची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला ३११ ते ५०५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला १७१ ते ३१० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला ९१ ते १७० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ४ ला १० ते ९० रुपये प्रति किलो भाव मिळाला. कांद्याच्या १२,५९१ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर १ ला १,५०० ते १,८०० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर २ ला १,००० ते १,४५० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर ३ ला ५०० ते ९५० रुपये, जोड कांद्याला ६०० ते १,२०० रुपये भाव मिळाला. ड्रॅगन फ्रूटची ४ क्रेट्सची आवक झाली. ड्रॅगन फ्रूटला ३५ ते ८० रुपये, तर सरासरी ६० रुपये प्रति किलो भाव मिळाला

# अहिल्यानगर सायबर शाखेकडून शिंगणापूर ॲप प्रकरणी गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनिदेवाची पूजा, अभिषेक व तेल अर्पण केला जाईल, असा खोटा मजकूर फसवणुकीच्या उद्देशाने संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन प्रसारित केल्याप्रकरणी अहिल्यानगर सायबर शाखेच्या वतीने शिंगणापूर पोलीस ठाण्यात अज्ञात ॲपधारक, मालक व साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सुदाम काकासाहेब काकडे (वय ३२, पोलीस उपनिरीक्षक सायबर पोलीस अहिल्यानगर) यांनी शिंगणापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की सायबर शाखेकडे देवस्थाने केलेल्या अर्जाची चौकशी अधिकारी व त्यांचे पथकाने संशयित ॲप व संकेतस्थळांची तांत्रिक चौकशी केली असता घर मंदिर, ऑनलाईन प्रसाद, पूजा परिसेवा, हरिओम व ई- पूजा या संकेतस्थळाचे धारक व मालक यांनी शनैश्वर देवस्थान व धर्मादाय आयुक्त यांची ऑनलाइन दर्शन पूजा अभिषेक व तेल चढावा बुकिंग करता कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी घेतलेली नाही व देवस्थानला कोणत्याही प्रकारची देणगी न देता संकेतस्थळ व ॲपधारक, मालक यांनी त्यांचे साथीदार सह श्री शनैश्वर मंदिर शनिशिंगणापूर येथील शनि महाराजांच्या शिळेचा फोटो, शनी मंदिराचा व महाद्वाराचा फोटो वापरला व संकेतस्थळ /अँपचे धारक मालक यांचे कोणतेही अधिकृत पुजारी शिंगणापूर येथे उपलब्ध नसताना देखील त्यांनी त्यांचे पुजारी मार्फत श्री शनैश्वर देवस्थान येथे शनि देवाची पूजा अभिषेक व तेल चढावा केला जाईल, असा खोटा मजकूर फसवणुकीच्या उद्देशाने संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन प्रसारित केला आहे. ऑनलाईन पद्धतीने भाविकांकडून अनियमित दराने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी रक्कम स्वीकारून शनैश्वर देवस्थान व भाविकांची फसवणूक केली आहे.

# मुळा धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** १० जुलै रोजी सायंकाळी पोलिस पथक पकडायला आल्याची चाहूल लागताच दोन तरुणांनी राहुरी तालुक्यातील वावरथ परिसरात मुळा धरणाच्या पाण्यात उडी मारली. दोघां पैकी एकजण पोहून बाहेर निघाला. मात्र रामा माळी हा तरुण पाण्यात बूडाला. आज चार दिवसानंतर तो फुगून पाण्यावर तरंगताना दिसून आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, लक्ष्मीबाई भागवत बाचकर (रा. जांभळी, ता. राहुरी) व त्यांचा मुलगा अंबादास हे दोघे घरात झोपले असताना मध्यरात्री तीन भामटे बाचकर यांच्या घरात घुसले आणि लक्ष्मीबाई बाचकर यांच्या गळ्यातील सोन्याचे डोरले व कानातील कर्णफूले ओरबाडून घेतली. तसेच पेटीतील सोन्याचे दागीने घेऊन पळून जात होते. तेव्हा लक्ष्मीबाई यांच्या मुलाने त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता भामट्यांनी लक्ष्मीबाई व त्याच्या मुलगा अंबादास यांना काठीने मारहाण करून ते पसार झाले होते.

लक्ष्मीबाई भागवत बाचकर यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी रवि (पुर्ण नाव माहीत नाही), रा. जांभळी, ता. राहुरी, व त्याचे सोबतचा एक अनोळखी इसम अशा दोन जणांवर घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

राहुरी येथील पोलिस पथक आरोपींचा शोध घेण्यासाठीच वावरथ येथे गेले. तेव्हा पोलिस पथक पकडायला आल्याची चाहूल लागताच रामा ज्ञानदेव माळी व संदिप बर्डे या दोन तरुणांनी मुळा धरणाच्या पाण्यात उडी मारली. दोघांपैकी संदिप बर्डे हा पोहून बाहेर आला. मात्र रामा माळी हा तरुण पाण्यात बुडाला. पोलिस प्रशासनाने सलग तीन दिवस धरणाच्या पाण्यात त्याचा शोध घेतला, मात्र तो मिळाला नाही. आज दि. १३ जुलै २०२५ रोजी रामा माळी याचा मृतदेह धरणाच्या पाण्यावर तरंगताना दिसून आला. पोलिस प्रशासनाने मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदना नंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. या घटने बाबत राहुरी पोलीस ठाण्यात आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक समाधान फडोळ हे करीत आहेत.

# मुकबधीर विद्यार्थ्यांनी लुटला चित्रपटाचा आनंद

## शिक्षकांचा सन्मान; विद्यार्थ्यांना जेवणासाठी ताटांची भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने विशेष म्हणजेच मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी सितारे जमीनपर हा हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी चित्रपट कोहिनूर मॉलच्या चित्रपटगृहात दाखविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन सेवाप्रीत फाउंडेशनच्या महिला सदस्यांनी केले होते.

वडगाव गुप्ता रोड, सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मुकबधीर विद्यालय व वस्तीगृहातील ५० विद्यार्थी आणि शिक्षकांनी या चित्रपटाचा आनंद घेतला. चित्रपटाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास, आशावाद आणि काहीतरी वेगळं करून दाखवण्याची उमेद जागविण्यात आली. चित्रपटादरम्यान मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख निशा धुप्पड, अर्चना खंडेलवाल, अन्नू थापर, गीता नय्यर, गीता माळवदे, बबीता जग्गी, नताशा धुप्पड, गीता धुप्पड, अर्चना ओबेरॉय, रिटा बक्षी, विना खुराणा, डॉ. सोनाली वहाडणे, बब्बू धुप्पड, संगीत ॲबट, मुकबधीर विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप जगधने आदींसह महिला सदस्या व विद्यार्थी उपस्थित होते. विशेष मुलांना एक प्रेरणादायी अनुभव देण्यासाठी सर्व महिला सदस्यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून योगदान दिले.

# आमचा पक्ष केवळ माजी मंत्री बाळासाहेब थोरातच

## पठार भागामध्ये सामान्य जनतेची हाक; तरुणाईच्या स्टेटसवर चर्चा

**जनता आवाज वत्तसेवा**

**संगमनेर :** लोकनेते हे निवडणुकीपुरते मर्यादित नसतात ते जनतेच्या हृदयात असतात. यशवंतराव चव्हाण यांची परंपरा जोपासणारे काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात हे महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. त्यांच्या प्रती जनतेमध्ये मोठी कृतज्ञता असून आमची निष्ठा आमचा पक्ष फक्त माजी मंत्री बाळासाहेब थोरात आहेत असे पठार भागातील सर्व कार्यकर्ते अभिमानाने सांगत आहेत.

घारगाव येथे अजय फटांगरे यांची काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदी निवड झाली. यावेळी सत्कार कार्यक्रमात अनेक नागरिकांनी व युवकांनी आपल्या भावना मांडल्या. यावेळी अरुण वाघ, नाना शेठ भालके, संदीप नाईकवाडी, गणेश आहेर, सर्जेराव ढमढेरे, राजवर्धन पिसाळ, सुरेश आहेर, गणेश लेंडे, बाळासाहेब ढोले, अक्षय ढोकरे, सचिन गाडेकर, उमेश आहेर, ज्ञानेश्वर आहेर, आमिर शेख, जयसिंग आहेर आदींसह पठार भागातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

जेष्ठ कार्यकर्ते सर्जेराव पाटील ढमढेरे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने जनतेसाठी काम केले आहे. आज संगमनेर हे नाव महाराष्ट्रात त्यांच्यामुळे आहे. सत्ता येते आणि जाते.



सत्तेच्या मागे पळायचे नसते. महाराष्ट्राची परंपरा आहे ती निष्ठावंतांच्या पाठीशी राहायचे. आमचा पक्ष आमची निष्ठा फक्त बाळासाहेब थोरात आहे. कुणी कितीही आले कुणी कितीही बोलले तरी आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत कारण उद्याचा महाराष्ट्र त्यांची वाट पाहतो आहे, अशी भावना मांडताना त्यांना गहिवरून आले.

सत्ता येते आणि जाते मात्र महाराष्ट्रातून नेते उभे करणारे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पाठीशी सामान्य जनता असल्याची कार्यकर्त्याची भावना आणि साहेबांची छबी युवकांच्या व कार्यकर्त्यांच्या सोशल मीडियावर जोरदार होती.

### काँग्रेसची ताकद वाढविणार

अजय फटांगरे म्हणाले की, युवा काँग्रेस पासून काम करताना जिल्हा परिषदेमध्ये माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी मला मोठी संधी दिली आणि त्या माध्यमातून विकासाच्या अनेक योजना बोटा गटामध्ये राबवले आहेत. विधानसभा निवडणुकीत धार्मिक मुद्दे पुढे आले. विष पेरले गेले परंतु आता जनतेला सत्य कळाले आहे. धर्माचे राजकारण करून विकास होत नाही सर्वांना सोबत घेतले पाहिजे. या पुढील काळात गाव तेथे शाखा उभारून काँग्रेस पक्ष अधिक ताकदीने उभा करू असे ते म्हणाले.

# बालांगण

## असे साजरे होतात उत्सव





भन्नाट

दोस्तांनो, आपल्याकडे सणांच्या निमित्ताने घराघरांमध्ये रोषणाई केली जाते. पणत्या लावल्या जातात. पण आपल्याप्रमाणे इतर देशांमध्येही प्रकाशाचा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव साजरा करण्याच्या पद्धती वेगळ्या असल्या तरी त्याचा उद्देश जवळपास सारखाच असतो.

✻ जपानामध्ये ओनियो फायर फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. हा सोहळा जानेवारी महिन्यात रंगतो. जपानमधल्या फुफुओकामध्ये लोक मेणबत्त्या आणि मशाली पेटवून संपूर्ण शहर उजळवून टाकतात. मशाली पेटवल्यामुळे संकटं दूर होतील, असं इथले लोक मानतात.

✻ थायलंडमध्ये लाम क्रयोंघ नावाचा उत्सव असतो. या उत्सवादरम्यान थाई लोक रात्रीच्या वेळी केळ्याच्या पानांपासून तयार केलेले दिवे लावतात. प्रार्थना करतात आणि हे दिवे वाहत्या पाण्यात सोडून दिले जातात.

✻ फ्लोरिडातल्या अल्टूना शहरात सॅमहेन फेस्टिवलचं आयोजन होतं. हा सुद्धा प्रकाशाचा उत्सव आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात हा उत्सव साजरा होतो.

✻ स्कॉटलंडमध्ये अप हेली नावाचा सण साजरा होतो. जानेवारी महिन्यातल्या शेवटच्या मंगळवारी हा सण साजरा होतो. या दिवशी इथले लोक प्राचीन काळातल्या योद्धयांप्रमाणे पेहराव करून मशाल घेऊन पदयात्रा काढतात.

## फरक माहिती आहे?




काळजी घ्या


बाजारातून कोणताही अन्नपदार्थ खरेदी करताना तुम्हाला मागच्या बाजूला एक्सपायरी डेट किंवा बेस्ट बिफोर डेट असे लिहिलेली दिसते. पण मित्रांनो, याचा अर्थ माहिती आहे का? बरेच लोक या दोन्ही तारखा सारख्याच मानतात. पण त्या पूर्णपणे भिन्न आहेत आणि त्यांचा अर्थ देखील वेगळा आहे. तेव्हा आज एक्सपायरी डेट आणि बेस्ट बिफोर डेट मध्ये काय फरक आहे ते जाणून घेऊ या.

एक्सपायरी डेट म्हणजे ज्या दिवसानंतर उत्पादन वापरण्यास सुरक्षित मानले जात नाही अशी तारीख. ही तारीख प्रामुख्याने औषधे आणि अन्नपदार्थांवर लिहिलेली असते. याचा अर्थ असा की, या तारखेनंतर हे उत्पादन वापरणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. जसे की, एक्सपायरी डेटनंतर ब्रेडसारख्या अन्नपदार्थांमध्ये बुरशी वाढू शकते. यामुळे अन्न विषबाधा होऊ शकते.

बेस्ट बिफोर डेट म्हणजे ज्या तारखेनंतर उत्पादनाची सर्वोत्तम चव किंवा गुणवत्ता कमी होऊ शकते ती तारीख. अर्थात या तारखेनंतर चव उतरत असली तरी तो पदार्थ खराब होत नाही. ही तारीख बहुतेकदा कोरडे अन्न, पॅक केलेल्या वस्तू आणि सौंदर्यप्रसाधनांवर लिहिलेली असते. यावरुन एवढेच समजते की, या तारखेनंतर संबंधित उत्पादनाच्या चव, पोत, रंग किंवा वासात काही बदल होऊ शकतो, परंतु उत्पादनात असा कोणताही बदल झाला नाही तर ते वापरले जाऊ शकते.

म्हणजेच बेस्ट बिफोर डेट नंतर देखील आपण उत्पादन वापरु शकतो. परंतु त्यातून विचित्र वास येत असेल, रंग बदलला असेल तर वापर करु नये. उत्पादनाची चव किंवा रंग बदलला असेल तर ते फेकून द्यावे. उत्पादन योग्यरित्या साठवले गेले असेल आणि ते बराच काळ टिकू शकते. सहाजिकच ते वापरले जाऊ शकते. तथापि उत्पादनाच्या एक्सपायरी डेट किंवा बेस्ट बिफोर डेटबद्दल काही शंका असेल तर ते न वापरणे चांगले.

## हे लक्षात आले?




असं का असतं?

मुलांनो, तुम्ही बातम्या वाचायच्या, सामान्य ज्ञान वाढवायचं तर पेपर वाचायलाच हवा. पण निरखून पाहिले तर पेपरच्या खालच्या बाजूला तुम्हाला चार रंगीत गोल दिसतील. ते तुमच्या लक्षात आले नसतील तर आता बघा. या रंगीत गोलांचा काय अर्थ असावा, हे गोल का बरं दिले जात असावेत, असे प्रश्न तुम्हाला पडले असतील. याच प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ.

पूर्वीच्या काळी वर्तपानपत्रं कृष्णधवल म्हणजे ब्लॅक अँड व्हाईट असायची. काळानुरुप त्यात बदल झाले आणि रंगीत फोटो, अक्षरं छापली जाऊ लागली. लाल, पिवळा आणि निळा असे तीन प्रमुख रंग असल्याचं तुम्हाला माहीत असेल. पेपर प्रिंट करण्यासाठी प्रिंटरचा वापर होतो. प्रिंटरमध्येही रंगांचं हेच तंत्र वापरलं जातं. प्रिंटरमध्ये या तीन रंगांसह काळ्या रंगाचा समावेश होतो. हे चार गोलांचा सीएमव्हायके हा क्रम असतो. यात सी म्हणजे सियान (निळा), एम म्हणजे मजेंटा (गुलाबी), वाय म्हणजे येलो (पिवळा) आणि के म्हणजे ब्लॅक (काळा) हे रंग असतात. या रंगांना योग्य क्रमाने जोडलं तर दुसरा कोणताही रंग मिळवता येतो. सीएमव्हायकेमुळे छपाईदरम्यान इतर रंग वृत्तपत्राच्या पानावर दिसू शकतात. वृत्तपत्र हातात घेतल्यानंतर काही फोटो धुरकट दिसत असतील किंवा रंग एकमेकांमध्ये मिसळले असतील तर सीएमव्हायकेचं तंत्र बिघडल्याचं समजावं.

## मोड वापरा, फोटो खुलवा



टेक्नो टिप्स

दोस्तांनो, आता फोटो काढण्यासाठी स्मार्टफोन वापरला जातो. स्मार्टफोनने फोटो काढण्याचं वेगळंच तंत्र आहे. फोनमध्ये वेगवेगळे मोड असतात. या मोड्सचा वापर करून तुम्ही छान छान फोटो काढू शकता. हे फोटो सोशल साईट्सवर पोस्ट करायचे असतात. त्यामुळे तुमचे फोटो छानच असले पाहिजेत. मग आता स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याने फोटो काढण्याचं तंत्र जाणून घेऊ.

✻ दोस्तांनो, तुमच्या फोनमध्ये बोकेह नावाचा मोड असतो. या मोडमध्ये फोटोची पार्श्वभूमी फिकट म्हणजे ब्लर करता येते. म्हणजे या फोटोत व्यक्ती अगदी स्पष्ट दिसते. तुम्ही या मोडचा वापर करू शकता. बोकेह मोडचा कौशल्याने वापर करून छान फोटो काढता येतील.

✻ रात्रीच्या वेळी फोटो काढायचे असतील तर नाईट स्केप मोड वापरा. या मोडमुळे रात्रीच्या अंधूक प्रकाशात तुम्ही छान फोटो काढू शकाल.

✻ काही स्मार्टफोनमध्ये अल्ट्रा वाइड अँगल कॅमेरा असतो. यामुळे सगळ्या ग्रूपचा फोटो येऊ शकतो. तुमच्या स्मार्टफोनमध्ये असा अँगल असेल तर त्याचा वापर करा.

## नाव घेताना बायका लाजतात



अजबगजब

छोट्या दोस्तांनो, उत्तर प्रदेशातील अनेक गावे प्रसिद्ध आहेत. यातील अर्ध्याहून अधिक गावे तर शहरांशी स्पर्धा करू शकण्याजोगी आहेत. या राज्यामध्ये तुम्हाला विविध संस्कृतींचे मिश्रण तसेच एकता पाहायला मिळेल. येथे प्रत्येक धर्माचे लोक राहतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे येथील लोक आजही आपल्या संस्कृतीशी, मातीशी जोडलेले आहेत.

तेथील अनेक गावांमध्ये संध्याकाळी घराबाहेर मुले खेळताना दिसतील. महिला विहिरीतून पाणी भरताना दिसतील. पुरुषांचा एक गट गप्पा मारताना, कामे करताना दिसेल. हे दृश्य आता शहरात दिसत नाही. असे असतानाच गावांची अशीही नावे आहेत जी ऐकून तुम्हाला नक्कीच हसायला येईल. कदाचित ती तुम्ही आधी कधीच ऐकलीही नसतील. चला तर, आज अशाच एका गावाविषयी जाणून घेऊ या.

यूपीमधील या गावाचे नाव घेण्यास महिलांना लाज वाटते तर दुसरीकडे पुरुष नाव घेताना हसतात. त्याच वेळी काही लोकांना मात्र त्याचा अभिमान आहे. हे गाव सुलतानपूर जिल्ह्यात असून भदैया ब्लॉकमधील बालमपूर असे त्याचे नाव आहे. हे गाव केवळ त्याच्या नावामुळेच चर्चेत नाही तर त्यात काही खासियत देखील आहे. गावाचे नाव बालमपूर असण्याचे एक खास कारण आहे. ते म्हणजे ते तीन भावांच्या नावावरुन पडले आहे.

## आता ई ब्लँकेटचा जमाना



नवं काही

दोस्तांनो, थंडीत जाड पांघरूण किंवा ब्लँकेट घेऊन झोपावंसं वाटतं. अंगावरचं ब्लँकेट बाजूलाही करावंसं वाटत नाही. परदेशात तर थंडीसाठीचं ब्लँकेट लोकर किंवा जाड कापडापासून तयार केलं जातं. मात्र आता आपण ई ब्लँकेट अंगावर घेऊ शकतो. मध्यंतरी श्याओमी या कंपनीने ई ब्लँकेट सादर केलं आहे. या ब्लँकेटचा वापर सहजपणे करता यावा यासाठी कंपनीने अॅपही तयार केलं आहे. आता हे ई ब्लँकेट अंगावर कसं घ्यायचं असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. पण कंपनीने ग्राहकांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली आहे. यात स्मार्ट स्लीप मोड आहे. त्यामुळे ब्लँकेट घेतल्यावर शांत झोप लागेल. या अनोख्या ब्लँकेटमुळे शरीराचं तापमान नियंत्रणात रहातं. पुरेशी ऊब देण्याचं काम हे ब्लँकेट करतं. ब्लँकेटमध्ये व्हॉईस असिस्टंटचीही सोय आहे. व्हॉईस असिस्टंटमुळे ब्लँकेटला तोंडी सूचनाही देता येतील. तेव्हा थंड प्रदेशात जायचं असेल तर हे घेऊन जायलाच हवं.

## बाबा, माझे बाबा!



कसे वागाल?

दोस्तांनो, वडील हा शब्द ऐकताच मनात एका अशा व्यक्तीची प्रतिमा उभी राहते, जो जास्त बोलत नाही पण ज्याच्या खांद्यावर आपण नेहमीच निश्चितपणे विसावतो. आई आपल्याला प्रेमाने आणि काळजीने वाढवते तर वडील जीवनातील प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहण्यास शिकवतात. अनेकदा आपण त्यांचा सल्ला, शिकवण ऐकत नाही. परंतु त्यांच्या प्रत्येक कामातून, प्रत्येक निर्णयातून आपण त्या स्वीकारत राहतो. हे मौल्यवान धडे आपल्याला जीवनाच्या कोणत्याही शर्यतीत मागे राहू देत नाहीत.

आपण बाबांना घर आणि कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या घेताना पाहतो. बिल भरणे असो, दुरुस्तीचे काम असो किंवा घरासाठी आवश्यक वस्तू आणणे असो... वडील नेहमीच आघाडीवर असतात. ते आपल्याला समजावून सांगत नाहीत तर जबाबदार असण्याचा अर्थ काय आहे हे कृतीतून दाखवतात. ते त्यांची झोप, आराम आणि कधीकधी मनातील इच्छाही बाजूला ठेवून कुटुंबासाठी कष्ट करतात. जबाबदारीची ही भावना पाहूनच तुम्ही मुले जीवनात आपली कर्तव्ये कशी पार पाडायची हे शिकता. हा धडा भविष्यात करिअरसाठी, नातेसंबंधांसाठी आणि समाजासाठी आपल्याला जबाबदार बनवतो.

बाबा काम करताना कधी अपयशीही ठरतात. पण ते हार मानत नाहीत. आपण नेहमीच त्यांना यशस्वी होईपर्यंत प्रयत्न करताना पाहतो. बाबा त्यांच्या अपयशांबद्दल उघडपणे क्वचितच चर्चा करतात, परंतु त्यांची चिकाटी आणि कधीही न हार मानण्याची वृत्ती आपल्याला खूप काही शिकवते. आपल्याला शिकायला मिळते की, अपयश हा आयुष्याचा शेवट नाही तर काहीतरी नवीन शिकण्याची आणि चांगल्या प्रकारे प्रयत्न करण्याची संधी आहे. ही मानसिक शक्ती सर्वात मोठ्या आव्हानाला तोंड देताना उपयोगी पडते. तीच संकटकाळात खंबीरपणे उभे राहण्याचे धैर्य देते.




## साखरेचे खाणार त्याला...





जाणून घ्या

छोट्या दोस्तांनो, आज आपण 'साखरमुक्त' आणि 'नो–अ‍ॅडेड शुगर' यातील फरक जाणून घेऊ या. एखाद्या उत्पादनावर नो–अ‍ॅडेड शुगर लिहिलेले असते, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की, त्यात अतिरिक्त साखर टाकलेली नाही. तथापि, याचा अर्थ असा नाही की त्या उत्पादनात अजिबात साखर नसते. त्या उत्पादनात नैसर्गिकरित्या असणारी साखर असते. फळांच्या रसात फ्रुक्टोज किंवा दह्यात लैक्टोज सारखी नैसर्गिक साखर असतेच. म्हणून तुम्हाला एखाद्या उत्पादनावर 'साखरेशिवाय' असे लिहिलेले लेबल दिसले तर समजून घ्या की त्यात कृत्रिम साखर मिसळलेली नाही. केवळ नैसर्गिक साखर आहे.

'साखरमुक्त' असे लेबल असणाऱ्या उत्पादनांमध्ये साखरेचे प्रमाण नगण्य असते. अशा उत्पादनांमध्ये गोडपणासाठी साखरेऐवजी कृत्रिम गोड पदार्थ वापरले जातात. उदाहरणार्थ, मधुमेहाच्या रुग्णांसाठी कोणताही गोड पदार्थ तयार करताना त्यात साखर नसते तर स्टीव्हियासारखे कृत्रिम गोड पदार्थ वापरले जातात.

आता तुमच्या मनात प्रश्न असेल की या दोघांपैकी कोणते चांगले आहे. तर उत्तर असे की, अतिरिक्त साखरेचे प्रमाण कमी करायचे असेल तर साखरेशिवाय तयार केलेली उत्पादने वापरणे चांगले असते. पण कोणी साखर खाणे पूर्णपणे थांबवू इच्छित असेल तर त्यांनी साखरमुक्त उत्पादने निवडणे चांगले.

ठिपके जुळवा



### स्मार्ट टिप्स

#### असा सुरू करा अभ्यास



छोट्या दोस्तांनो, सुट्टी संपल्यावर तुम्ही पुन्हा अभ्यासाला लागला असाल. सुट्टीमुळे अभ्यासाचा थोडा कंटाळा आलेला असतो. पण तुम्हाला पुन्हा एकदा रिचार्ज व्हायला हवं. अभ्यासाला लागायला हवं. यासाठी तुमच्या आवडत्या विषयाचा अभ्यास करायला सुरूवात करा. गणिताचा कंटाळा येत नाही.

### खादाडी


#### मेक्सिकन कॉर्न



काही चटपटीत खायचं असेल तर तुम्ही मेक्सिकन कॉर्न हा पदार्थ बनवू शकता. यासाठी मक्याची दोन कणसं उकडून घ्या. तीन चमचे मेयोनीज, दोन चमचे क्रीम, एक चमचा लाल तिखट, लिंबाचा रस, पाव कप किसलेलं चीझ, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ असे पदार्थ घ्या. आता एका बाउलमध्ये मेयोनीज, क्रीम, मीठ आणि लाल तिखट घालून नीट हलवून घ्या. आता मेयोनिजचं हे मिश्रण उकडलेल्या मक्याच्या कणसांवर नीट लावून घ्या. त्यावर लिंबाचा रस लावून वरून किसलेलं चीझ आणि कोथिंबिर घाला. मस्तपैकी मेक्सिकन कॉर्न खा.

### दोस्त हे मस्त

#### असे हे सी ऑटर



सी ऑटर हा प्राणी बराच वेळ पाण्यात रहातो. ऑटर हा प्राणी ऑस्ट्रेलिया खंड सोडून इतर प्रत्येक खंडात आढळतो. ऑटरचे दात अणकुचीदार असतात. तो पटकन शिकार करतो. ते पोहण्यासाठी शेपटीचा वापर करतात. त्यांचे पाय खूप छोटे असतात. म्हणूनच त्यांना पोहायला आवडत असावं.

### योगा टाईम

#### महत्त्व सूर्यनमस्कारांचं




मुलांनो, दररोज सूर्यनमस्कार घालायला हवेत. सूर्यनमस्कार हा संपूर्ण व्यायाम आहे. या व्यायामामुळे तुमचा आजारांपासून बचाव होईल. सर्दी, खोकला, ताप असे आजार फार त्रास देणार नाहीत. तुमचं लक्षही केंद्रित व्हायला मदत होईल. सूर्यनमस्काराची गोडी लागली की तुम्ही हा व्यायाम नियमितपणे कराल.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11